ठी

चरित्र-५२ सन १८९२

लेखक - महाराष्ट्र कोकीळ कर्ते.

पु. नांव - दादाभाई नौरोजी चरित्र.

(श्री प्रिंटर्स अॅण्ड

दादाभाई

नौरोजी चरित्र

चरित्र

म. ग्रं. सं. ठाणें
परिभ,
नं. ८३
सन १९८२

मूल्यपुस्तकमाला.
१

ऑनरेबल

# दादाभाई नवरोजी, एम्. पी.,

## ह्यांचें सचित्र चरित्र.

श्लोक.

अहा! आनंदाचा दिन उगवला हाच पहिला।
अहा! सद्भाग्याचा रुचिर मजला आज दिसला॥
अहा! कालाब्धीचा हळुच गगनीं चंद्र चढला।
अहा! 'दादाभाई' नृपतिसहकारी निवडिला॥ १॥

—देशसेवकः वसन्त.

हें लहानसें पुस्तक,
'महाराष्ट्रकोकिल' मासिक पुस्तककर्ते
ह्यांनीं लिहिलें,
तें

**मराठी लिटररी सोसायटी,**
गिरगांव पोस्ट, मुंबई, ह्यांनीं
मुंबईंत "तत्त्वविवेचक" छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.
अक्टोबर सन १८९२.
किंमत दीड आणा.

सुंदर आणि उपयुक्त, स्वस्त व मजेदार नवीन पुस्तक.

# भारतभाग्योदय

अथवा

## नागपूर येथील ७ व्या राष्ट्रीय सभेचें साद्यंत वर्णन व मागील ६ राष्ट्रसभांची संक्षिप्त माहिती.

ह्या पुस्तकांत नागपूर येथें भरलेल्या ७ व्या राष्ट्रीयसभेचें साद्यंत वर्णन फार प्रेमळ व चटकदार भाषेंत लिहिलें आहे. तें वाचलें असतां सभेचा अपूर्व व मनोहर देखावा मूर्तिमंत दिसूं लागतो. सर्व वक्त्यांचीं भाषणें आणि त्या त्या वेळचें सभेचें रमणीय स्वरूप ह्या पुस्तकांत फारच कुशलतेनें वर्णिलें आहे. हें पुस्तक नागपूर येथील राष्ट्रीयसभेच्या स्वागतमंडळीचे अध्यक्ष लोकप्रिय सद्गृहस्थ मि० नारायणस्वामी नायडू यांस समर्पण केलें असून प्रारंभीं त्यांचें सचित्र मनोरम चरित्रही दिलें आहे, व शेवटीं मागील ६ राष्ट्रीयसभांची संक्षिप्त माहिती देऊन सुंदर कविता घातल्या आहेत. हें पुस्तक अत्यंत लोकप्रिय झाल्यामुळें त्याच्या ५,००० प्रतींपैकीं फारच थोड्या प्रती शिल्लक आहेत, व त्या दररोज संपत चालल्या आहेत. ह्या पुस्तकाचीं एकंदर बारीक टाईपाचीं ७५ पृष्ठें असून छपाई सुरेख आहे.

आंतील मजकुराबद्दल सर्व पत्रकर्त्यांनीं व विद्वानांनीं फारफार प्रशंसा केली आहे. त्यांपैकीं फक्त दोघां विद्वान पत्रकारांचे संक्षिप्त अभिप्राय खालीं दिले आहेत:—

१ **केसरी** (पुणें, ता. १४ – ६ – ९२) "+ + + समारंभाची हकीकत, सभेचा वातवेत, मुख्यमुख्य राष्ट्रीयसभाभक्तांचें वर्णन, यांनें या छोट्याशा पुस्तकास जास्त मनोरमत्व आलें आहे. करितां, प्रत्येक राष्ट्रीयसभेची माहिती मिळवूं इच्छिणारानें दोन आणे खर्च करून हें पुस्तक एकदां तरी वाचावें अशी आमची त्यास शिफारस आहे."

२ **देशसेवक** (नागपूर, ता. १० – ७ – ९२) "+ + + ह्या पुस्तकांत वापरलेली भाषा फार चटकदार आहे. वर्णन करण्याची शैली अशी कांहीं मार्मिक आहे कीं, वाचणाराचे मनांत त्या वेळचें हुबेहुब चित्र उभें राहतें. 'प्रतिनिधींस मेजवानी' हा भाग वाचला असतां आमचें म्हणण्याची सार्थकता वाचणाराचे मनांत येईल......सारांश, हें लहानसें पुस्तक प्रत्येक मराठी भाषा जाणणाराचे संग्रहीं असावें अशी आम्ही शिफारस करितों."

☞ **ह्याशिवाय पुष्कळ उत्तम अभिप्राय आले आहेत.**

**किंमत**—१ प्रतीस २ आणे, ट. ह. अर्धा आणा. ५ प्रतीस ट. ह. माफ **महाराष्ट्रकोकिल** किंवा **मासिकवृत्तमाला** ह्या मासिक पुस्तकांच्या ज्या वर्गणीदारांकडून आगाऊ वर्गणी असेल त्यांस ट. ह.सह फक्त १॥ आणा किं. पडेल.

**पत्ता—मराठी लिटररी सोसायटी.** गिरगांव पोस्ट, मुंबई.

हिंदुस्थानची राजकीय स्थिति दाखविणारी मजेदार मराठी कादंबरी.

# हिंद आणि ब्रिटानिया.

ही कादंबरी मूळची गुजराथी भाषेंत असून ती इतकी अद्वितीय व सर्वोत्कृष्ट झाली आहे कीं, हिंदुस्थानांतील सर्व वर्तमानपत्रांनीं तिची वाहवा केली आहे एवढेंच नव्हे पण अमेरिका, फ्रान्स, एशिया, इंग्लंड, इत्यादि देशांतील नामांकित पत्रकारांच्याही प्रशंसनेस ती पात्र झाली आहे. ह्या कादंबरीमध्ये लॉर्ड मेयो, लॉर्ड लॉरेन्स, लॉर्ड मनरो, लॉर्ड केनबोर्न, सर जॉन के, कर्नल मेडोज टेलर, कर्नल म्यालिसन, डाक्टर हंटर, फॉसेट, कॉब्डेन, मार्समन, ब्राईट, एडविन आर्नोल्ड, कॉटन वगैरे महत्पुरुषांचीं हिंदुस्थानाविषयींचीं मतें फार चातुर्यानें **हिंदुस्थान** आणि **इंग्लंड** ह्या दोन स्त्रिया कल्पून त्यांच्या मुखांतून दिग्दर्शित केलीं आहेत. ह्यांतील विषय इतका महत्वाचा आहे कीं, प्रत्येक राष्ट्रहितचिंतकानें त्याचें अवश्य मनन केलें पाहिजे. ह्या कादंबरीच्या प्रारंभीं उदार मूर्ति **लॉर्ड रिपन** ह्यांचें चित्र व शेवटीं कांहीं सुंदर पद्यें जोडलीं आहेत. प्रत्येक सहृदय वाचकास ही कादंबरी वाचतांना खरोखर स्वदेशस्थिति पाहून नानाप्रकारच्या महत्वाच्या कल्पना आल्यावांचून राहणार नाहींत! कादंबरीच्या नमुन्याचें सुरस वर्णन करून त्यांत राजकीय स्थितीचा देखावा हुबेहुब वठविण्याची ग्रंथकर्त्याची शैली खरोखर अत्यंत प्रशंसनीय आहे. ह्या कादंबरीवर राजद्रोहाचा आरोप येऊन खुद्द गव्हरनर-जनरलच्या कौन्सिलांत तिचा विचार होऊन ती पूर्ण राजनिष्ठ ठरली आहे. ज्या पुस्तकाबद्दल एवढा विचार झाला आहे, व जें सर्व पृथ्वीवर अत्युत्तम ह्मणून ठरलें आहे, आणि इंग्रजी, बंगाली व उर्दु इत्यादि भाषांत ज्याचीं भाषांतरें होत आहेत, त्याचें मराठी भाषांतर किती वाचनीय व विचारणीय झालें असेल ह्याची कल्पना वाचकांनींच करावी. छपाई अत्युत्कृष्ट व कागद मोहरेदार वापरला आहे. तेव्हां हें अंतर्बाह्य सुंदर पुस्तक प्रत्येक महाराष्ट्रभाषा जाणणारानें अवश्य संग्रहीं ठेवावें अशी आमची त्यास विनंति आहे.

ह्या पुस्तकाचा सांचा डेमी अष्टपत्री असून पृष्ठसंख्या ३१५ आहे. किंमत रु. १॥. ट. ख. ६ आणे जास्त पडेल.

महाराष्ट्रकोकिल किंवा मासिकवृत्तमाला ह्या मा. पु. च्या ज्या वर्गणीदारांकडून आगाऊ वर्गणी आली असेल त्यांस ह्या पुस्तकाची फक्त एक १ प्रत ट. ह. सह रु. १॥ स दिली जाईल.

☞ फारच थोड्या प्रति शिल्लक आहेत, करितां मागविणारांनीं त्वरा करावी.

**पत्ता—मराठी लिटररी सोसायटी,** गिरगांव पोस्ट, **मुंबई.**

| | रु. | आ. | पै. |
|---|---|---|---|
| श्रीदत्तचरित्र, सचित्र ...... | १ | ० | ० |
| श्रीमाणिकप्रभु यांचें चरित्र... | १ | ८ | ० |
| अमोलिक वैद्यक चातुर्य ... | १ | ४ | ० |
| अभिज्ञान शाकुंतल, सटीक... | ३ | ८ | ० |
| आजकालच्या गोष्टी, २ भाग | १ | १२ | ० |
| आमच्या देशाची स्थिति ... | ० | ४ | ० |
| आर्यवसुंधरा नाटिका ...... | ० | १२ | ० |
| डॉ. सौ. आनंदीबाईचें चरित्र. | २ | ० | ० |
| इतिहास प्रसिद्ध पोवाडे ...... | २ | ८ | ० |
| इसापनीति ............... | ० | ४ | ० |
| एकनाथ चरित्र ............ | ० | ३ | ० |
| कुटुंबसुधारणा ............ | ० | २ | ० |
| खेळियासंग्रह ............ | ० | १२ | ० |
| गुणोत्कर्षनाटक, २ री आ.... | ० | ८ | ० |
| गुरुचरित्र, रेशमी ......... | १ | १२ | ० |
| गोमंतकाचा इतिहास ...... | ० | १४ | ० |
| चंद्रसेन लीलावती ....... .. | १ | ८ | ० |
| चंपा नाटक............... | ० | १२ | ० |
| चाणक्षपणाचा कळस ...... | १ | ४ | ० |
| चित्रयुक्त अक्षरबोध ...... | ० | ८ | ० |
| जॉर्ज वाशिंगटनचें चरित्र ... | ० | १२ | ० |
| झुंझारराव नाटक (देवल)... | ० | १२ | ० |
| टेम्पेस्ट नाटक ............ | १ | ० | ० |
| ठगाची जबानी ............ | २ | ८ | ० |
| तंट्या भिल्ल .............. | ० | २ | ६ |
| तुकारामाची गाथा ......... | २ | ८ | ० |
| तुलसीदासकृत रामायण ... | ४ | ० | ० |
| त्रिवेणीप्रभाव ........... | २ | ० | ० |

| | रु. | आ. | पै. |
|---|---|---|---|
| दुर्गा नाटक ( देवल )...... | ० | ५ | ० |
| नारायणराव आणि गोदावरी. | १ | ० | ० |
| नवनारी चरित्र............ | ० | ६ | ० |
| निबंधमाला, ३ भाग ...... | ३ | ० | ० |
| नीतिमीमांसा ............ | १ | ८ | ० |
| न्याय तत्त्वें .. ............ | २ | ० | ० |
| पाक शास्त्र ............... | १ | ४ | ० |
| पुष्पकरंडक .............. | ० | १० | ० |
| पेशवाईची बखर (साने) ... | १ | ४ | ० |
| प्रेमबंधन................ | १ | ८ | ० |
| बगीच्याचें पुस्तक, सचित्र... | ३ | ८ | ० |
| बृहत्स्तोत्रसरित्सागर ......... | २ | ४ | ० |
| भोळा भिकारी सदाशिव ... | ० | ८ | ० |
| मारून मुटकून वैद्यबुवा ... | ० | ४ | ० |
| मुंबईचें वर्णन ........... | २ | ८ | ० |
| मुंबईचा व्यापार........... | ० | १० | ० |
| रामदास स्वामींचें चरित्र ... | १ | ६ | ० |
| रासेलस ............... | ० | ९ | ० |
| लोकरीचें विणकाम शि. पु. | ० | १२ | ० |
| विचारशिक्षा ............ | ० | १० | ० |
| वेदांतसार .............. | ० | ८ | ० |
| वेणू ................... | १ | ० | ० |
| शहाणा नेथन ........... | १ | ० | ० |
| समंति कायद्याचें नाटक ... | ० | १२ | ० |
| समाजविवेक ........... | ० | १२ | ० |
| हरितमताई चरित्र......... | २ | ० | ० |
| सुशील गृहस्थ नाटक ...... | १ | ४ | ० |
| ज्ञानेश्वर महाराजांचें चरित्र. | ० | १२ | ० |

☞ किंमतीशिवाय टपालखर्च निराळा पडेल. रोख पैसे किंवा पोस्टाच्या तिकिटा पाठवून अगर व्ही. पे. नें पुस्तकें मागवावीं. सर्व पत्रव्यवहार बाळबोध अगर इंग्रजी लिपींत करावा.

**पत्ता—मराठी लिटररी सोसायटी, गिरगांव पोस्ट, मुंबई.**

## A CONGRATULATORY SONNET.

———:o:———

Dear Dadabhai Naoroji, good and great,
Accept with kindness, patriot, true and bold,
Defender firm of India, poor and old,
A nation's thanks to thee, her advocate ;

By facts and figures and by feats sedate
At proper times with zeal then didst uphold ?
In England old, the cause of India new, behold !
Now thy success she well doth celebrate,

Although a hasty lord once blacken'd thee,
Abservant Finsbury yet makes thee shine
Right well in Britain's Parliament supreme ;
O Member of that body, fair and free,
Just causes win at last ; may Sprite Divine
Indeed bless thee with happiness extreme !

R. SIVASANKARA PANDIYAJI,

B. A., F. T. S.

ऑनरेबल
दादाभाई नवरोजी, एम्. पी.



॥ श्री ॥

## ऑनरेबल

# दादाभाई नवरोजी, एम्. पी.

॥ 'सत्यश्रमाभ्यां सकलार्थसिद्धिः' ॥

हें सद्वचन अगदीं सत्य आहे. परंतु, तें सत्य करून दाखविणाऱ्या मूर्ति मात्र ह्या भूतलावर क्वचित् अवतीर्ण होतात. ह्याचें कारण कांहीं अंशीं, कालदेशवर्तमान हें होय, असें मानण्याचा प्रघात पडला आहे. आणि खरोखर, **महाराष्ट्र**-राज्यसंस्थापन करणारे **क्षत्रिय**कुलावतंस **श्री छत्रपति शिवाजी महाराज** किंवा **अमेरिका** खंडास स्वातंत्र्यप्रदान करणारे निस्सीम स्वदेशभक्त **जॉर्ज वाशिंग्टन** अशीं लोकोत्तर नररत्नें वारंवार सुप्राप्त कां होत नाहींत? ह्या प्रश्नाचा शांतपणानें विचार केला, तर आपणांस असें समजून येईल कीं, हें सर्व, कालदेशवर्तमान अनुकूल नसल्याचें फल होय, किंवा, पर्यायेंकरून एका **संस्कृत** कवीनें म्हटल्याप्रमाणें :—

**शैले शैले न माणिक्यं मौक्तिकं न गजे गजे ॥**
**साधवो नहि सर्वत्र चंदनं न वने वने ॥ १ ॥**

ह्या न्यायानें, अनेक **शिवाजी महाराज** किंवा अनेक **जॉर्ज वाशिंग्टन** निर्माण होणें अशक्य होय असें म्हणतां येईल. मग, लोकोत्तर पुरुषरत्नांची इतकी दुर्लभता असतांना एखाद्या राष्ट्रास महद्भाग्यानें तसलें अप्रतिम रत्न लाभलें तर तें त्यास अत्यंत भूषणप्रद वाटावें हें साहजिक आहे. **नामदार दादाभाई नवरोजी** हें आमच्या **भरतखंडां**तील दिव्य शिरोरत्न होत. ह्या नररत्नाच्या

चरित्ररूप प्रभेमध्यें शिरोभागीं दिलेल्या **संस्कृत** सिद्धांताचें प्रमेय व तदितर अनंत सद्गुण पूर्णपणें वसत आहेत, म्हणून त्या प्रभेचें अल्पसें परावर्तन **महाराष्ट्र**-भाषाभिज्ञ वाचकांच्या हृत्पटांवर उमटविण्याचा थोडासा प्रयत्न करणें अवश्य आहे.

**दादाभाई** ह्यांचा जन्म **मुंबई** येथें सन १८२५ च्या सप्टेंबर महिन्यांत झाला. ह्यांचे आईबाप एका संभावित **पार्शी** घराण्यांतील होते. तरी त्यांची गृहस्थिति ह्या वेळीं साधारणपणें निकृष्टच होती असें म्हटलें तरी चालेल. त्यांना **दादाभाईं**च्या जन्मकालीं, 'हें पुत्ररत्न अत्यंत तेजस्वी निपजून आपल्या संदीप्ति-लहरींनीं सर्व भूमंडळ व्यापून टाकील' ही कल्पनाही नव्हती! तरी त्यांना पुत्रप्राप्तीचा अत्यंत आनंद झाला. त्यांनीं बालपणीं **दादाभाईंचें** फार कौतुक केलें. **दादाभाई** जसजसे शैशवावस्थेंतून मोठे होऊं लागले तसतसे त्यांच्या बाललीला आणि मंजुमंजु बोल त्यांच्या मातापितरांस व आप्तसुहृदांस आनंदप्रद वाटूं लागले. **दादाभाईंस** पंचम संवत्सर प्राप्त होतांच त्यांच्या वडिलांनीं त्यांस मातृभाषेचा अभ्यास करण्याकरितां, **मुंबईच्या** एका **गुजराथी** शाळेमध्यें घालून विद्यादेवीची आराधना करावयास लाविलें. तेथें ह्या चिमुकल्या 'दादी'च्या बुद्धिमत्तेचा थोडाथोडा विकास होऊं लागला. **गुजराथी** भाषेचें बरेंच अध्ययन झाल्यानंतर त्यांस **इंग्रजी** भाषा शिकण्याकरितां 'एल्फिन्स्टन इन्स्टिटयूट' मध्यें पाठविलें. तेथें त्यांची बुद्धिमत्ता, अभ्यासप्रियता, आणि नियमितपणा हे गुण हळूहळू सुप्रकाशित होऊन, तेथील अध्यापकांचें त्यांच्यावर विशेष प्रेम जडूं लागलें. त्या विद्यालयांतील प्रतिवार्षिक परीक्षांमध्यें ते सर्वानुमतें पसंत ठरून, त्यांस वारं-वार पारितोषिकें मिळूं लागलीं; आणि अशा रीतीनें अल्पकालामध्यें ते त्या **आंग्ल**-पाठशाळेंतील अत्युत्तम विद्यार्थिमंडळामध्यें अग्रगण्य ठरले. **मिसेस पोस्टन** नामक एका पाश्चात्य ग्रंथकर्त्रीनें **दादाभाईंचें** विद्यालयांतील बालस्वरूपाचें चटकदार वर्णन आपल्या 'पश्चिम हिंदुस्थान' नामक पुस्तकांत केलें आहे. तें असें:—"ह्या वेळीं विद्यार्थिवर्गामध्यें एक लहान पण तरतरीत मुलगा होता. त्याचें तें तेजःपुंज विशाल भाल आणि सतेज नेत्रद्वय पाहून कोणाही प्रेक्षकाचें चित्त त्याकडे आकर्षित झाल्यावांचून राहत नसे. वर्गांत कांहीं प्रश्न विचारला कीं, हा बालविद्यार्थि सर्वांच्या पुढें येऊन व उजवा हात पुढें करून आपल्यावर केव्हां प्रश्नोत्तर देण्याची पाळी येते अशी उत्सुकता दाखवी. तो गणितप्रश्न व सिद्धांतप्रश्न विचारपूर्वक तेव्हांच सोडवून टाकी. त्याच्या प्रश्न सोडविण्याच्या रीतिही मोठ्या चमत्कारिक असत. त्याला सर्व विद्यार्थ्यांमध्यें अग्रेसरत्व पटका-विण्याची फारच महत्वाकांक्षा होती, आणि त्याच्या अद्वितीय बुद्धिचापल्यावरून हा पुढें फार थोर पुरुष निपजणार असें दिसत होतें."

आंग्लविद्यालयांतील प्राथमिक **इंग्रजी**शिक्षण संपल्यानंतर **दादाभाई** हे उच्च शिक्षण संपादन करूं लागले. त्या वेळीं कित्येक विद्वान् **आंग्ला**ध्यापक त्यांची हुषारी पाहून अनेक वेळां प्रसन्न चित्तानें **दादाभाईं**ची फारफार प्रशंसा करीत असत. **प्रोफेसर ऑलिवार** ह्मणून **दादाभाईं**चे जे मुख्याध्यापक असत, ते, **दादाभाईं**च्या अंगीं, बालस्वरूपांत वसत असलेल्या कित्येक राष्ट्रोपयोगी सद्गुणांवरून त्यांस "**हिंदुस्थान**ची भावी आशा" असें म्हणत असत. खरोखर, 'भवोहि लोकाभ्युदयाय तादृशाम्' ही सदुक्ति **दादाभाई** हे, पुढें यथार्थ पालन करणार हें भविष्य, गुरुवर्यांस अगोदर कळून आल्यामुळें त्यांनीं त्यांस वरील विशेषण दिलें होतें कीं काय न कळे! पण शिष्यानें मात्र आपल्या पूज्य गुरूंचे '**हिंदुस्थान**ची भावी आशा' हे मौक्तिकतुल्य शब्द खरे करून दाखविले ह्यांत लवमात्र शंका नाहीं! असो.

सन १८४५ सालीं **मुंबई** येथील श्रेष्ठ न्यायसभेचे प्रमुख न्यायाधिकारी, व शाळाखात्याच्या व्यवस्थापक मंडळीचे अध्यक्ष, **सर अर्स्किन पेरी** ह्यांनीं, **दादाभाईं**ची अप्रतिम बुद्धि व आकलनशक्ति अवलोकन करून, एतद्देशीय जनांमध्यें विद्यासंवृद्धि व्हावी ह्या सदिच्छेनें, त्यांस कायद्यांचा अभ्यास करण्याकरितां **विलायते**स पाठविण्याचा विचार केला. एवढेंच नव्हे पण त्यांच्या खर्चाची निम्मी रक्कम ते स्वत: देण्यास तयार झाले; आणि बाकीची **सर जमशेटजी जिजीभाई** आणि इतर शेटसावकार ह्यांनीं द्यावी असा त्यांनीं प्रयत्नही केला. ह्या त्यांच्या प्रयत्नास प्रथमत: थोडेंसें यश येईल असें वाटलें होतें, परंतु, पुढें तो अगदीं निरर्थक झाला. कारण, त्या संधीस कित्येक **पार्शी** गृहस्थ **विलायते**स जाऊन **खिस्त**धर्मानुयायी बनल्यामुळें **दादाभाईं**वर देखील ह्या परदेशयात्रेचा तसाच परिणाम होईल कीं काय ह्या भीतीनें तो विचार रहित झाला! असो. ह्यानंतर **दादाभाईं**च्या विद्वत्तेबद्दल व अनेक विषयपारंगततेबद्दल सर्वत्र प्रशंसा होऊन त्यांस **प्रिन्सिपाल हार्कनेस** ह्यांनीं सुवर्णपदक बक्षीस दिलें. पुढें, त्यांनीं कांहीं दिवस उपशिक्षकाचें काम केल्यानंतर, त्यांस 'एलफिन्स्टन कालेजा'मध्यें गणितशास्त्र व पदार्थविज्ञानशास्त्र हे दोन विषय शिकविण्याकरितां उपाध्यापकाची जागा मिळाली. त्या विषयांत **दादाभाई** पूर्ण निष्णात् असल्यामुळें, व त्यांस विषयप्रतिपादनशैली पूर्ण अवगत असल्यामुळें, छात्रसमूहावर त्यांची तेव्हांच छाप बसून, त्यांच्या मुखांतून **दादाभाईं**च्या शिक्षणकलेविषयीं स्तुतिवाद निघूं लागले. त्यामुळें मुख्याध्यापक **प्रोफेसर जोसेफ पॅटन** स्वदेशीं गेल्यानंतर, त्यांच्या महत्पदावर **दादाभाईं**चीच योजना करण्यांत आली. ह्यापूर्वीं एवढा मोठा मान एतद्देशीय गृहस्थास मुळींच मिळाला नव्हता! परंतु, **दादाभाईं**नीं ज्या विद्यालयामध्यें विद्यार्जन केलें त्याच विद्यालयामध्यें विद्याप्रदान

करण्याइतकी मोठी योग्यता मिळविली ही गोष्ट सामान्य नव्हे!! सन १८५४–५५ सालच्या वार्षिक रिपोर्टामध्यें विद्याधिकारी मंडळीनें ( बोर्ड ऑफ एज्युकेशन ) **दादाभाईं**च्या ह्या अति श्रेष्ठ अध्यापकपदाबद्दल मुद्दाम उल्लेख करून त्यांत त्यांचें अभिनंदन केलें आहे. त्याचप्रमाणें, ह्या मंडळीचे चिटणीस **डाक्टर एम्. स्टॉव्हेल** ह्यांनीं **दादाभाईं**स एक अभिनंदनपत्र पाठवून असें प्रदर्शित केलें आहे कीं, तुम्ही आपला 'कार्यक्रम शांतपणानें, सरल मार्गानें आणि एक चित्तानें चालवाल तर खचित तुम्ही कालांतरानें स्वदेशास भूषणभूत व्हाल ह्यांत कांहीं संशय नाहीं.'

अशा प्रकारें **दादाभाईं**च्या कीर्तिचंद्राची सुखकर कौमुदी त्यांच्या तारुण्य-भरामध्येंच सर्व प्रसृत होऊं लागली होती, तरी त्याच्या शीतल प्रकाशानें संतुष्टहृदय होऊन **दादाभाई** स्वस्थ बसले नाहींत. त्यांच्या ठिकाणीं उद्यमप्रियता हा अद्वितीय सद्गुण कांहीं विशेष प्रमाणानें वास करीत असल्यामुळें, ते शास्त्राध्यापना-मध्येंच गुंग होऊन आपल्या महत्कर्तव्यास विसरले नाहींत. सुमारें दहा वर्षेंपर्यंत त्यांच्याकडे अध्यापकाचें काम होतें, परंतु तितक्या अवधींत त्यांनीं तें उत्तम प्रकारें करून, आणखी अनेक लोकोपयोगी संस्था सुरू केल्या; व त्यांच्या उन्न-त्यर्थ अश्रांत परिश्रम करून त्यांस चिरस्थायित्व मिळवून देण्याची योग्य तजवीज केली. ह्या त्यांच्या संस्थांची थोडीशी नाममालिका येथें सादर करणें अवश्य आहे. 'स्टुडंटस् लिटररी आणि सायंटिफिक सोसायटी,' 'गुजराथी ज्ञानप्रसारक सभा,' 'धि बांबे असोसिएशन,' 'पार्शीधर्मसुधारक मंडळी ( The Rahnoomae Mazdisna Society ),' 'फ्रामजी कावसजी इन्स्टिटयूट,' 'धि इराणी फंड,' 'पार्शी व्यायामगृह,' 'हिंदुपुनर्विवाहोत्तेजक मंडळी,' 'व्हिक्टोरिया आणि अलबर्ट पदार्थसंग्रहालय,' आणि 'मुलींची शाळा' इ. इ. ह्या सर्व संस्थांचें पुरस्क-र्तृत्व सर्वस्वी **दादाभाईं**कडेच होतें असें नाहीं, तरी 'स्टुडंटस् लिटररी आणि सायंटिफिक सोसायटी' आणि 'मुलींची शाळा' ह्या दोन संस्थांचे **दादाभाई** हे मुख्य उत्पादक होते असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. स्त्रीशिक्षणासंबंधानें **दादाभाईं**नीं जी अंतःकरणपूर्वक मेहनत घेतली तीवरून **मुंबई** इलाख्यांतील समाजसुधारणेच्या इतिहासांत 'स्त्रीशालांचे जनक' ह्मणून त्यांचें नांव अभि-निविष्ट झालें आहे. सन १८४९ सालीं त्यांनीं 'स्टुडंटस् लिटररी आणि सायंटि-फिक सोसायटी' स्थापन केली. त्या वेळीं त्यांचें वय अवघें २४ वर्षांचें होतें.

**दादाभाईं**च्या मनावर पाश्चात्य शिक्षणाचा चांगला प्रकाश पडला होता, व त्यांना आपल्या ज्ञानाचा लोकांस उपयोग करून द्यावा अशी उत्कट इच्छा होती, त्यामुळें त्यांनीं वरील संस्थांचें काम कित्येक सन्मित्रांच्या साह्यानें निरपेक्ष बुद्धीनें चालविलें होतें. त्यांच्या साह्यकारी मित्रमंडळीमध्यें **कै० राव साहेब मंडलिक**

हे देखील होते. **दादाभाई** व **रावसाहेब मंडलिक** प्रभृति मंडळी स्त्रीशिक्षणप्रसारार्थ नुसतें वाक्पांडित्य करीत नसून, रिकाम्या वेळांत त्या शाळांत जाऊन स्वतः शिक्षण देत असे. व तेंच त्या शाळांच्या सांप्रतकालीन ऊर्जितावस्थेचें मूळ कारण होय, असें स्पष्ट ह्मटल्यावांचून आमच्यानें राहवत नाहीं.

**दादाभाई** ह्यांच्या ठिकाणीं लोकोपकार करण्याची जी नैसर्गिक बुद्धि परमेश्वरानें उत्पन्न केली होती, ती दिवसेंदिवस अधिकाधिक प्रकाशित होऊं लागली. वर निर्दिशित केलेल्या अनेक संस्थांचें प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीतीनें **दादाभाई** अध्वर्युत्व अथवा साह्यकारित्व पतकरून तत्प्रीत्यर्थ कायावाचामनेंकरून झटत होते. तों पुनः त्यांच्या ठिकाणीं वृत्तपत्रद्वारें स्वदेशसेवा करण्याची लालसा उत्पन्न झाली. प्रथमतः त्यांनीं 'समाचारदर्पण' नामक **गुजराथी** पत्रामध्यें 'साक्रेटीस आणि डायओजीनस ह्यांचा संवाद' म्हणून पुष्कळ लेख प्रसिद्ध केले, व सन १८५१ सालीं त्यांनीं स्वतः 'रास्त गोफतार' नांवाचें स्वतंत्र वर्तमानपत्र सुरू केलें. ह्या पत्रामध्यें सुमारें दोन वर्षेंपर्यंत **दादाभाईंनीं** खऱ्या कळकळीचे सुंदर लेख प्रसिद्ध केले, व किंबहुना त्यांच्या ह्या लेखनप्रयत्नानें **पारसिकांनीं** चालविलेल्या पत्रांची स्थिति बरीच सुधारली जाऊन लोकांमध्यें **गुजराथी** वृत्तपत्रांस चांगला मान मिळूं लागला.

**दादाभाईं**च्या अंगीं, 'वाया जावो नेदी क्षण, हेंचि सभाग्याचें लक्षण' हें साधुवचन पूर्णपणें बाणलें असल्यामुळें ते निमिषमात्र देखील व्यर्थ दवडीत नसत. त्यांचे नानाविध उद्योग सुयंत्रित चालले होते. हें पाहून कोणासही त्यांच्या कार्यक्षमतेचें आश्चर्य वाटल्यावांचून राहणार नाहीं! अध्यापकत्व आणि वक्तृत्व हे दोन गुण **दादाभाईं**च्या ठिकाणीं समरूपानें वसत होते. त्यांची वाणी अर्थभारवती असल्यामुळें सर्व जनांस त्यांच्या वक्तृत्वरसाचें पान करावें अशी उत्कंठा होई. 'स्टुडंटस् लिटररी व सायंटिफिक सोसायटी'मध्यें नेहमी त्यांचीं मनोरम व्याख्यानें होत असत. 'ज्ञानप्रसारक' मंडळीपुढें त्यांनीं पदार्थविज्ञान व ज्योतिःशास्त्र ह्या दोन विषयांवर शोधपूर्वक व सुविचारपरिप्लुत अशीं सुमारें अठरा व्याख्यानें दिलीं. तीं व इतर त्यांचे महत्वाचे लेख 'ज्ञानप्रसारक' मासिक पुस्तकांत त्या वेळीं छापून प्रसिद्ध झाले होते. ते अवलोकन करून अनेक विद्वानांस **दादाभाईं**च्या विद्वत्तेचा हा प्रभाव अत्यंत असामान्य होय असें वाटूं लागलें. **दादाभाईंनीं पारसिक** धर्मविषयावरही अनेक लेख लिहिले होते. असो. असे त्यांचे अनंत उद्योग चालले होते तरी पुनः ते ज्ञानभांडारामध्यें इतस्ततः संचार करून नवीन नवीन भाषारत्नांचा लाभ करून घेत होतेच. साधारण मनुष्यास लहानलहान दोनतीन कामें असलीं तर तो गोंधळून जाऊन 'कार्य-

बाहुल्या 'च्या खोल दरीमध्यें अंतर्धान पावतो, आणि **दादाभाई** अनंत उद्यो स्वीकारून पुनः अनेक भाषाज्ञानारविंदाचें शोधन करण्याकरितां अलिरूप धारण करून ज्ञानाटवीमधून हिंडत असत, हें पाहिलें ह्मणजे **दादाभाईस** लोकोत्तर पुरुषां मध्येंच गणणें भाग पडतें. अनंत कार्यकर्तृत्वांत विजय संपादन करून **फ्रेंच हिंदुस्थानी, गुजराथी, पर्शियन,** आणि **मराठी** इत्याद्यनेक भाषांमध्यें पारं गत होऊन 'अनेक भाषाकोविदत्व' मिळविण्यास उद्युक्त होणारा पुरुष अद्वि तीय होय असें कोण ह्मणणार नाहीं ?

असो. सन १८५५ हें **खिस्त**संवत्सर प्राप्त झालें, आणि **दादाभाईंच्या** व्यवसायाची दिशा बदलली. ह्या वर्षी **इंग्लंडा**मध्यें **कामा कंपनी** स्थापन होऊन तिनें **इंग्लंडा**मध्यें व्यापार करण्याचा क्रम आरंभिला. **विलायते**मध्ये ह्या पूर्वी व्यापार करणारी एतद्देशीय मंडळी मुळींच संस्थापित झाली नसल्यामुळे ह्या **कामा कंपनी**चा उद्देश बराच भीतिदायक होता. परंतु, **दादाभाईस** तो पूर्ण संमत होऊन, त्यांनीं त्या मंडळीचा एक भाग (शेअर) स्वीकारिला. आज पर्यंत **दादाभाईस** व्यापारसंबंधीं मुळींच अनुभव नव्हता, तथापि त्यांनीं मोठ्या साहसानें वाणिज्यवृत्ति स्वीकारिली, आणि **इंग्लंड** देशाची सफर करण्याकरितां आपल्या जन्मभूमीस वंदन करून नौकेमध्यें आरोहण केलें! **दादाभाईचें** हें साहस खरोखर त्यांच्या सुहृज्जनांस दुःखदायक होतें. तरी त्यांत त्यांचा अत्यंत अभिनंदनीय असा एक सुहेतु होता. तो कोणता ह्मणाल तर स्वदेशहितकर्तृत्व. त्यांच्या मनांतून **हिंदुस्थान** व **इंग्लंड** ह्यांचें दळणवळण वाढवून, विशेषेंकरून **हिंदुस्थान**वासी जनांस **सिव्हिल सर्व्हिस** आणि वैद्यकीच्या परीक्षेचा अभ्यास करण्याची **इंग्लंडा**मध्यें कांहीं तरी सोय काढावी असें फार होतें. खरोखर **दादाभाईंच्या** ह्या परोपकारबुद्धीचा विचार करूं लागलें कीं आह्मांस—

**'नाभ्यर्थितोऽपि जलदः सलिलं ददाति**
**संतः स्वयं परहितेषु कृताभियोगाः'**

ह्या सज्जनांच्या वर्तनक्रमनियमाचें स्मरण होतें. खरोखर, दीन चातकांची तृषार्तता अवलोकन करून ज्याप्रमाणें मेघराजाच्या ठिकाणीं आपोआपच जलवृष्टि करण्याची उपकारबुद्धि उत्पन्न होते, त्याप्रमाणें सज्जनांना देखील परहित करण्याची बुद्धि आपोआपच सुचते ह्यांत कांहीं शंका नाहीं. वस्तुतः पाहतां स्वदेश अथवा स्वजन ह्यांचा परित्याग करून, परदेशगमनासारख्या समयीं प्राणघात करण्याच्या कृत्याचा स्वीकार करण्याचें **दादाभाईस** मुळींच प्रयोजन होतें काय ? असो.

**दादाभाई विलायतेस** गेल्यानंतर व्यापारोद्योग करूं लागले. 'देशाटनं पंडितमित्रता' ह्या न्यायानें हळूहळू तिकडील महाजनांशीं त्यांचा परिचय होऊ

लागला. अल्पकालामध्यें त्यांच्या विद्वत्तेचा कीर्तिपरिमल आंग्लजनांमध्यें पसरत जाऊन 'विद्वान् सर्वत्र पूज्यते' ह्या नियमाप्रमाणें अनेक विद्वत्परिषदेमध्यें त्यांना सन्मान मिळूं लागला. 'लिव्हरपूल लिटररी व फिलॉसॉफिक सोसायटी,' 'फिलोम्पाथिक सोसायटी,' 'कौन्सिल ऑफ् लिव्हरपूल अथेनियम,' 'कॉटन सप्लाय असोसिएशन ऑफ् म्यांचेस्टर,' 'रॉयल इन्स्टिटयूशन ऑफ् लंडन,' 'रॉयल एशियाटिक सोसायटी ऑफ् ग्रेट ब्रिटन अँड ऐर्लंड,' 'एथनालॉजिकल सोसायटी,' 'अँन्थ्रोपोलॉजिकल सोसायटी,' 'दि सोसायटी ऑफ आर्ट्स' इत्यादि विद्वत्सभांनीं त्यांस आपलें सभासदपद समर्पण केलें. दादाभाईनीं आपला मुख्य हेतु साधण्याकरितां हिंदुस्थानवासी जनांचें आंग्लजनांस सत्यज्ञान व परिचय होण्याकरितां 'लंडन इंडियन असोसिएशन' आणि 'ईस्ट इंडिया असोसिएशन' ह्या मंडळ्यांची बेताबेतानें स्थापना केली. दादाभाईस लौकरच 'लंडन युनिव्हर्सिटी कॉलेजच्या गुजराथी भाषेचे अध्यापकपद (प्रोफेसरशिप) व तेथील सीनेटचें सभासदपद प्राप्त झालें. ह्याशिवाय, दादाभाईस इतके अनंत सन्मान मिळाले कीं त्या सर्वांचा नुसतां नामनिर्देश करणेंही येथें अशक्य आहे!

दादाभाईनीं अशा प्रकारें स्वतःच्या अलौकिक बुद्धिसामर्थ्यानें व अपूर्व दीर्घोद्योगितेनें आंग्लजनांचीं मनें आकर्षण केल्यानंतर आपल्या मुख्य हेतुप्रदीपनास प्रारंभ केला. प्रथमतः 'ईस्ट इंडियन असोसिएशन'च्या द्वारें व अनेक ठिकाणीं अनेक भारतस्थितिद्योतक व्याख्यानें देण्याचा आणि सहृदय आंग्लजनांपुढें भारतवासियांची शोचनीय स्थिति मूर्तिमंत उभी करून, त्यांचें उदार मन दयार्द्र करण्याकरितां अनेक लेख व पुस्तकें प्रसिद्ध करण्याचा क्रम चालविला. सन १८५९ सालीं त्यांनीं हिंदुस्थानचे स्टेट सेक्रेटरी लॉर्ड स्टयान्ले ह्यांच्याबरोबर सिव्हिल सर्व्हिसच्या नियमांसंबंधानें पत्रव्यवहार सुरू करून, त्यांच्याकडून असें आश्वासन मिळविलें कीं, सिव्हिल सर्व्हिसच्या नियमांमध्यें एकाएकीं कोणतेही फेरफार केले जाणार नाहींत. ह्या योगानें विलायतेस जाऊन सिव्हिल सर्व्हिसचा अभ्यास करूं इच्छिणाऱ्या लोकांस थोडेंसें उत्तेजन आल्यासारखें झालें. दादाभाईच्या मनामध्यें पुष्कळ हिंदुलोकांनीं विलायतेस जाऊन सिव्हिल सर्व्हिसचा अभ्यास करावा, व त्या परीक्षेमध्यें उत्तीर्ण होऊन हिंदुस्थानामध्यें मोठमोठ्या अधिकाराच्या जागा मिळवाव्या, असा फार हेतु होता. व त्याकरितां विलायतेमध्यें त्यांचा सतत प्रयत्न चालला होता. त्यांनीं पुष्कळ एतद्देशीय लोकांस विलायतेस येऊन सिव्हिल सर्व्हिसचा अभ्यास करण्याबद्दल विनंति केली, एवढेंच नव्हे पण त्यांनीं स्वतः विलायतेंत परीक्षेकरितां जाणाऱ्या हिंदुलोकांची सर्व प्रकारें व्यवस्था ठेवण्याबद्दल मनस्वी काळजी घेतली. कोणीही गृहस्थ विलायतेस गेला तर त्याला दादाभाई साह्य करण्यास अगदीं तत्पर

असत. त्यामुळें **विलायतेस** जाणाऱ्या सर्व लोकांस **दादाभाई** हे आश्रयधामच वाटत असत.* असा त्यांचा लौकिक अद्यापि चालू आहे.

**विलायतेस** असतांना **दादाभाईं**ना व्यापारसंबंधानें एकदोन वेळां अतिशय तोटा सोसावा लागला, तरी त्यांचा प्रामाणिकपणा व दृढनिश्चय लवमात्रही ढळला नाहीं. सन १८६० सालीं त्यांनीं **म्यांचेस्टर** येथें 'कापसाचा पुरवठा' ह्या विषयावर एक व्याख्यान दिलें, व त्याबद्दल तिकडील **इंग्रजी** वर्तमानपत्रांत त्यांची फार वाहवा झाली. सन १८६१ सालीं 'पार्शीधर्म व पार्शीलोकांच्या चालीरिती' ह्या विषयावर बरेच लेख अनेक विद्वत्समूहांस वाचून दाखविले. ह्याच वर्षी **दादाभाई** यांनीं **डा० मंचरजी वैरामजी कोला** नामक **पार्शी** गृहस्थास 'इंडियन मेडिकल सर्व्हिसच्या' परीक्षेस घेण्याकरितां विशेप खटपट केली. सदर गृहस्थ सध्यां **हिंदुस्थाना**मध्यें एक महत्पदाधिकारी झाले आहेत. सन १८६५ सालीं त्यांनीं 'लंडन इंडियन सोसायटी' पुढें सिव्हिल सर्व्हिसच्या नियमांसंबंधानें अनेक व्याख्यानें देऊन त्या संस्थेमार्फत स्टेट सेक्रेटरीकडे कांहीं प्रयत्न चालविला, व त्याचा सुपरिणाम असा झाला कीं, त्या परिक्षेमध्यें **संस्कृत** व **आरबी** ह्या दोन भाषांचे कमी झालेले गुण पूर्ववत् देण्याचा ठराव झाला. सन १८६६ सालीं **दादाभाईं**नीं 'एथनालॉजिकल सोसायटी' पुढें 'युरोपियन लोक व **एशिया** खंडांतील लोक' ह्या विषयांवर कांहीं लेख वाचून दाखवून **आंग्ल**जनांच्या मनांतील **भरतखंड**वासी जनांविषयींच्या अनुदार ग्रहांचा लोप करण्याचा प्रयत्न केला. **हिंदुस्थाना**विषयीं **युरोपियन** लोकांच्या मनामध्यें कळकळ उत्पन्न करण्याकरितां त्यांनीं निरपेक्ष बुद्धीनें व खऱ्या स्वदेशभक्तीनें 'ईस्ट इंडिया असोसिएशन' मार्फत जे प्रयत्न केले ते अत्यंत वर्णनीय होत. त्या सर्वांचें वर्णन सविस्तरपणें केलें असतां एक प्रचंड ग्रंथच होईल. आम्हीं फक्त त्यांतील मुख्यमुख्य गोष्टींचें येथें दिग्दर्शन केलें आहे. सन १८६७ सालीं त्यांनीं 'इंग्लंडचें हिंदुस्थानसंबंधीं कर्तव्य;' 'म्हैसूर;' 'इंडियन सिव्हिल सर्व्हिसमध्यें एतद्देशियांचा शिरकाव होण्याबद्दल विनंति व अर्ज;' आणि 'अबिसिनियाच्या युद्धाचा खर्च,' इतक्या विषयांवर उत्तम माहिती मिळवून ती निबंधरूपानें सभेस सादर केली. सन १८६८ सालीं, **मुंबई** इलाख्यांतील **इंग्लंडां**त राहणाऱ्या लोकांचा अर्ज; **मिस कार्पेंटर** बाईंना सुचविल्याप्रमाणें 'फीमेल

---

* दादाभाई ह्यांनीं, हिंदु लोकांनीं विलायतेस येऊन सिव्हिल सर्व्हिसचा अभ्यास करावा म्हणून नुसतें वाक्पांडित्य केलें नाहीं, तर त्यांनीं स्वतः सरकारानें असे विद्यार्थि पाठविल्यास त्यांच्या खर्चाकरितां ५०,००० रुपये देण्याबद्दल आपला हेतु कळविला होता, पण तो दुर्दैवानें सिद्धीस गेला नाहीं.

नॉर्मल स्कूल' संस्थापन करण्याबद्दल **सर स्टॅफर्ड नार्थकोट** यांच्याबरोबर पत्रव्यवहार, इंडियन सिव्हिल सर्व्हिसमध्यें सुशिक्षित नेटिवांचा प्रवेश, तत्संबंधीं **सर स्टॅफर्ड नार्थकोट** यांनीं पार्लमेंट सभेमध्यें केलेल्या भाषणांवर प्रत्युत्तर, गव्हरनर-जनरल ऑफ इंडिया बिल ह्यामधील इंडियन सिव्हिल सर्व्हिसच्या कलमांसंबंधानें **सर स्टॅफर्ड नार्थकोट** यांच्याशीं पत्रव्यवहार, **म्हैसूर**प्रकरणीं **लॉर्ड उइलियम** हे ह्यांस प्रत्युत्तर, लोकल इंडियन असोसिएशन्सचीं कर्तव्यें, **हिंदुस्थानां**तील धरणाचीं बांधकामें, इत्यादि विषयांवरील महत्वाचे लेख त्यांनीं प्रसिद्ध केले. अशा प्रकारें **दादाभाईं**नीं **हिंदुस्थान**च्या हिताप्रीत्यर्थ प्रयत्न करून ते सन १८६९ सालीं **मुंबई** येथें आले.

त्या वेळीं **मुंबापुरीय** महाजनांनीं त्यांना एक सन्मानपत्र, कांहीं द्रव्याची रक्कम आणि एक पुतळा समर्पण केला. ह्या सन्मानपत्रामध्यें **दादाभाईं**च्या देशबांधवांनीं त्यांचें कृतज्ञतापूर्वक किती स्तुतिस्तोत्र गाइलें आहे आणि तें किती यथार्थ आहे हें तें मानपत्र वाचलें असतां कोणांसही समजून येईल ? **दादाभाईस** ह्या समयीं जें द्रव्य मिळालें तें सर्व त्यांनीं सार्वजनिक कृत्यामध्यें खर्च करून टाकिलें. ह्यावरून त्यांची असाधारण स्वहितत्यागतत्परता व्यक्त होते. बरोबरच आहे 'परहितनिरतानामादरो नात्मकार्ये' हा सज्जनांचा धर्मच होय.

**दादाभाई मुंबईस** आले तरी त्यांचा स्वदेशकल्याणाचा प्रयत्न एकसारखा चालला होताच. सन १८६९ सालीं **दादाभाई** यांनीं **मुंबापुरींत** 'ईस्ट इंडिया असोसिएशन'ची शाखा संस्थापित करण्यासाठीं **गुजराथी** व **इंग्रजी** भाषांमधून आपल्या अप्रतिम वाक्पटुत्वाचा उपयोग करून ही उपयोगी संस्था उदयास आणिली. त्याच वर्षी, **गोंडल**संस्थानाधिपतींच्या निमंत्रणावरून भरलेल्या एका प्रचंड लोकसभेपुढें **दादाभाई** यांनीं 'हिंदुस्थानची स्थिति' ह्या विषयावर फार सुंदर व्याख्यान दिलें. त्या व्याख्यानामध्यें **दादाभाईं**च्या मुखांतून उद्गत होणारी स्वदेशाची सद्यस्थिति श्रवण करून **ठाकूर साहेबांस** व विद्वान् श्रोतृवृंदास **दादाभाईं**च्या स्वदेशैकनिष्ठ विचारांबद्दल स्तुतिवाद गाइल्यावांचून राहवलें नाहीं. त्याच वर्षी **दादाभाई** ह्यांनीं 'बांबे कॉटन ॲक्ट ऑफ १८६९' ह्या संबंधानें एक सुंदर लेख लिहिला. त्यामध्यें त्यांनीं ह्या कापसाच्या कायद्यामुळें होणारें स्वदेशाचें नुकसान व प्रजेच्या गैरसोयी ह्यांचें इतकें सप्रमाण व निःपक्षपात विवेचन केलें होतें कीं, त्या योगानें स्टेट सेक्रेटरी साहेबांनीं तो कायदा नामंजुर करून टाकिला. सन १८७० सालीं त्यांनीं 'हिंदुस्थानच्या गरजा' ह्या विषयावर व सन १८७१ सालीं 'हिंदुस्थानचा व्यापार' आणि 'हिंदुस्थान देशाची वसुलाची व्यवस्था' ह्या दोन विषयांवर फारच महत्वाचे लेख लिहिले. त्या लेखांच्या

योगानें पुष्कळ **आंग्लजनांस हिंदुस्थान**च्या राजकीय स्थितीचें बरेंच सत्य स्वरूप अवगत होऊन त्यांना **हिंदुस्थान**च्या राज्यकारभारांत थोडेंथोडें लक्ष घालण्याची इच्छा उत्पन्न होऊं लागली. सन १८७२ सालीं **दादाभाई** यांनीं **मुंबापुरीय** स्थानिक राज्यव्यवस्थेची सुधारणा करण्याबद्दल स्वतः पुढाकार घेऊन चांगली खटपट केली. सन १८७३ सालीं ते **विलायतेस** पार्लमेंटच्या 'सिलेक्ट कमिटी' पुढें **हिंदुस्थान**संबंधीं कांहीं पुरावा देण्याकरितां गेले होते. सन १८७४ सालीं ते पुनः **हिंदुस्थानांत** परत आले. ह्या वेळीं **बडोदें** संस्थानांत फारच अव्यवस्था झाली होती. **श्रीमंत मल्हारराव गायकवाड** हे त्या वेळीं संस्थानचा राज्यकारभार चालवीत होते. **दादाभाई**च्या अलौकिक बुद्धिमत्तेची व चातुर्याची कीर्ति श्रवण करून त्यांनीं त्यांस आपल्या संस्थानचीं प्रधानकीचीं वस्त्रें स्वीकारण्याबद्दल फार आग्रह केला. **दादाभाई**च्या मनामध्यें देशी संस्थानच्या उन्नतीबद्दल अत्यंत उत्सुकता असल्यामुळें, व प्रत्यक्षतः त्यांस संस्थानांतील राजनीतीचा चांगलासा परिचय नसल्यामुळें, त्यांनीं **गायकवाड** सरकारच्या विनंतीस मान दिला, आणि **वटोदरपुरीस** जाऊन दिवाणगिरीचीं वस्त्रें घेतलीं.

**दादाभाई** ज्या वेळीं **बडोदें** संस्थानामध्यें गेले, त्या वेळीं सर्व लोकांस **पार्शी** गृहस्थ दिवाण झाला हें पाहून फार आश्चर्य वाटलें. कारण, त्यापूर्वीं **बडोदें** संस्थानांत **पार्शी** गृहस्थ कधींच दिवाण झाला नव्हता. **दादाभाई**सारखा चतुर पुरुष **बडोदें** संस्थानांत मुत्सद्देगिरी करूं लागला हें पाहून कित्येक स्वार्थसाधनपटु राजसेवकांस अत्यंत वाईट वाटूं लागलें. **दादाभाई**च्या सत्य, स्तुत्य व न्याय्य वर्तनापुढें पूर्वींचे कपटपटु मुत्सद्दी लटपटूं लागले, एवढेंच नव्हे पण कित्येक **युरोपियन** अधिकारी, **दादाभाई**च्या राज्यकारभारापुढें चकारशब्द काढीतनासे झाले. **दादाभाई**नीं आपल्या कारकिर्दीमध्यें संस्थानाची सुधारणा करून प्रजाहितवर्धनार्थ पुष्कळ चांगल्या व्यवस्था केल्या, आणि 'नृपतिजन पदानां दुर्लभःकार्यकर्त्ता' ह्या **भर्तृहरी**च्या वचनांतून मुक्त होण्याचा प्रयत्न केला. परंतु संस्थानांतल्या कुटिल व कृष्ण कारस्थानांपुढें, **दादाभाई**च्या प्रामाणिकपणा, स्पष्ट वक्तृत्व आणि सत्यप्रियता ह्या गुणांना हार घेणें भाग पडलें. त्यामुळें त्यांनीं अवघे सात आठ महिनेच 'सेनाखासखेल समशेर बहादुरा' च्या दिवाणगिरीचा उपभोग घेऊन राजीनामा दिला! **दादाभाई**च्या प्रधानकीचा **बडोदें** संस्थानास पुष्कळ काळ लाभ झाला असता, तर त्यांत पुष्कळ सुधारणा होऊन फार महत्वाच्या व स्मरणीय अशा उत्तम गोष्टी झाल्या असत्या, परंतु तसा योग आला नाहीं. तथापि, **दादाभाई**च्या कारकीर्दीमुळें अप्रत्यक्षतः एक दुसरी अत्यंत महत्वाची—किंबहुना विशेष स्मरणीय अशी—गोष्ट घडून आली.

ती ही कीं, **बडोद्याचे** तत्कालीन रेसिडेंट—**कर्नल फेयर**—ह्यांनीं **बडोद्याच्या** राज्यव्यवस्थेसंबंधानें, संस्थानाधिपतीसंबंधानें, आणि **दादाभाई** प्रभृति दरबारी लोकांसंबंधानें कित्येक असंबद्ध व असत्य विधानें पार्लमेंटच्या 'ब्लु बुकां'मध्यें प्रसिद्ध केलीं होतीं. त्या वेळीं **दादाभाईं**नीं प्रांजल बुद्धीनें स्पष्टपणें, ह्या 'कलकत्तावाला बच्चा लोक है, कुच नहि समजते' अशी **लॉर्ड नॉर्थब्रुक** साहेबांसारख्या गव्हरनरांसही तुच्छ मानणाऱ्या राजविलासी रेसिडेंट (**कर्नल फेयर**) साहेबांचीं सर्व विधानें खोडून टाकिलीं. व त्या वादविवादाचा परिणाम इतका झाला कीं, **लॉर्ड नॉर्थब्रुक** साहेबांनीं **कर्नल साहेबांस बडोद्याच्या** रेसिडेन्सीवरून दूर केलें असें म्हणतात! खरोखर, ही मोठी महत्वाची गोष्ट नव्हे काय?

**दादाभाई** ह्यांना **बडोदें** संस्थानांत आपल्या हेतूप्रमाणें पुष्कळ सुधारणा करण्यास अवधि सांपडली नाहीं, तरी त्यांना त्या दुर्घट स्थितीमध्यें जेवढें कांहीं करतां आलें, तेवढें त्यांनीं केलें ह्यांत बिलकुल संदेह नाहीं, व **सर बार्टल फ्रियर** ह्यांच्यासारख्या **युरोपियन** गृहस्थांनींही ही गोष्ट कबूल केली आहे.

**बडोदें** संस्थानची दिवाणगिरी सोडल्यानंतर **दादाभाई** परत **मुंबईस** आले. तेथें त्यांना सन १८७५ सालीं 'बांबे म्युनिसिपाल कॉरपोरेशन' व 'टाऊन कौन्सिल' ह्या दोन संस्थांचे सभासदपद प्राप्त झालें. सन १८७६ सालापर्यंत त्यांनीं ह्या पदासंबंधीं आपलें कर्तव्य उत्तम रीतीनें बजाविलें, व त्यांनीं त्या पदाचा स्वसंतोषानें राजीनामा दिला. त्या वेळीं सन १८७६ च्या सप्टेंबर महिन्यांत कॉरपोरेशनकडून त्यांच्या खरी कळकळ आणि सतत परिश्रम ह्या दोन गुणांबद्दल विशेष आभार मानण्यांत आले. ह्याच वर्षीं त्यांनीं **मुंबई** म्युनिसिपालिटीच्या 'विहार लेन' संबंधानें व म्युनिसिपाल ॲक्ट संबंधानें वगैरे जें महत्वाचें काम केलें त्याचा विचार केला नाहीं, तरी ह्या वर्षीं त्यांनीं 'हिंदुस्थानचें दारिद्र्य' ह्या विषयावर जे दोन सुरेख लेख लिहिले आहेत, ते अत्यंत प्रशंसनीय होत असें म्हटल्यावांचून आमच्यानें राहवत नाहीं.

सन १८७६ पासून सन १८८३ पर्यंत **दादाभाईं**नीं जीं कामें केलीं त्यांपैकीं, त्यांचा **सर अर्स्किन पेरी** यांच्याबरोबर, 'एतद्देशीय लोकांना उच्च प्रतीच्या सरकारी जागा देण्याबद्दल चाललेला पत्रव्यवहार,' 'पंजाब इलाख्याची सांपत्तिक स्थिति व त्याच्या गरजा' ह्या विषयावर सेक्रेटरी ऑफ स्टेट ह्यांना लिहिलेलीं पत्रें, त्याचप्रमाणें त्यांना 'हिंदुस्थानचे नैतिक दारिद्र्य आणि ब्रिटिश-इंडियन राजनीतीबद्दल एतद्देशीय लोकांचे विचार' ह्या विषयावर लिहिलेलें सण-सणीत पत्र; सन १८८० च्या फिन्यान्स कमिशनच्या रिपोर्टावर टीका, आणि

**मि० हिंडमन** ह्यांच्याशीं चालविलेला हिंदुस्थानासंबंधीं विविध विषयांवरील पत्रव्यवहार हीं विशेष महत्वाचीं होत, असें ह्मणणें अवश्य आहे.

**दादाभाई** अनंत सद्गुणांनीं मंडित असल्यामुळें त्यांच्याकडे मोठमोठे सन्मान चालून यावेत हें अगदीं साहजिक आहे. सन १८५५ सालीं त्यांना ग्रांड ज्यूरीचें सभासदपद मिळालें होतें, सन १८६४ सालीं त्यांना **मुंबापुरीय** विश्वविद्यालयाचे सभासद केले होते, तरी सन १८८३ सालीं 'जस्टिस ऑफ दि पीस' हा मोठा सन्मानाधिकार सरकारांकडून त्यांस देण्यांत आला, व सन १८८५ सालीं **मुंबई**चे गव्हरनर—**लॉर्ड रे**—ह्यांनीं त्यांना, **मुंबई**च्या कायदेकौन्सिलाचे सभासदपदाचा बहुमान समर्पण केला. त्या वेळीं प्रजाहितवादी वृत्तपत्रकारांनीं जो आनंदघोष केला, त्यावरून **दादाभाई**सारख्या सुयोग्य गृहस्थांच्या कायदेकौन्सिलांतील नेमणुकीनें सर्व लोकांस—विशेषतः **मुंबई** इलाख्यांतील रहिवाशांस—परम संतोष झाला असें दिसून आलें. त्या प्रसंगीं एका **गुजराथी** पत्रकारांनीं तर असें स्पष्ट ह्मटलें होतें कीं, "पूर्वकालीं शिक्षक बनलेले आमचे **दादाभाई** हे सुशिक्षित एतद्देशीय गृहस्थांतील शिरोरत्नच होत. त्यांनीं आपल्या मतस्वातंत्र्याचा त्याग केला असता तर त्यांना कोठेंही एखादी मोठी सरकारी जागा मिळाली असती, व ह्या वेळेपर्यंत त्यांना पेनशनही मिळालें असतें. परंतु, **प्रोफेसर दादाभाई** ह्यांना स्वहितसाधनापेक्षां लोकहितकर्तृत्व विशेष पसंत वाटलें, आणि त्यांनीं स्वहितत्याग करून आपलें सर्व लक्ष तिकडे वळविलें. पण पंगु नशिबानें त्यांच्यावर मेहेरनजर केली नाहीं, व आमच्या सरकारानेंही त्यांच्या गुणांचा योग्य स्वीकार केला नाहीं. कारण, बड्या सरकारी अधिकाऱ्यांना **दादाभाई**सारख्या सुंदर रत्नांची किंमतच समजली नाहीं! परंतु, खऱ्या देशभक्ताला सरकारच्या मानसंभावनेची कोठून पर्वा असणार? तथापि, **लॉर्ड रे** ह्यांना 'गुणाः पूजास्थानं' देण्याचें उत्तम प्रकारें माहीत असल्यामुळें त्यांनीं, **दादाभाई, तेलंग, बद्रुद्दिन**, आणि **रानडे** अशीं रत्नें एकत्र केलीं ही मोठी आनंदाची गोष्ट आहे इ. इ." हें अगदीं सत्य आहे.

सन १८८५ सालापासून **दादाभाईं**च्या चरित्रास विलक्षण गंभीर स्वरूप प्राप्त होऊन त्यावर अवर्णनीय दिव्य प्रभा चमकूं लागल्यामुळें तद्वर्णनार्थ आमचें मन विशेष उत्सुक झालें आहे, तरी त्याच्या अगोदरच्या दोनतीन महत्वाच्या गोष्टींचा उल्लेख केल्यावांचून आमच्यानें राहवत नाहीं. त्या गोष्टी येणेंप्रमाणें होत:—

'व्हॉईस ऑफ इंडिया' (हिंदुस्थानचा स्वर) नामक मासिक पुस्तकाचें प्रकाशन, शिक्षण विचारमंडळा(एज्युकेशन कमिटी)पुढें शिक्षणसंबंधीं मांडलेला सुंदर लेख, आणि न्यायमूर्त्ति **लॉर्ड रिपन—हिंदुस्थान**चे लोकप्रिय व्हाइसरॉय—ह्यांच्या

प्रयाण समयीं तत्सन्मानार्थ व महोत्सवदर्शनार्थ केलेली विलक्षण खटपट, ह्यांतील शेवटच्या गोष्टीच्या योगानें दादाभाईंची अप्रतिम राजनिष्ठा आणि संस्थान-दक्षता व्यक्त झाली ह्यांत बिलकुल शंका नाहीं.

सन १८८५ सालीं दिसेंबर महिन्यांत मुंबई येथें राष्ट्रीयसभेची संस्थापना ह्मणजे हिंदुस्थानाच्या कल्याणाचें बीजारोपण करण्यांत, दादाभाई हे प्रमुख असून त्यांनीं तत्प्रीत्यर्थ चांगले परिश्रमही केले. त्या राष्ट्रीयसभेमध्यें दादाभाईंनीं जीं भाषणें केलीं आहेत त्यांचें दिग्दर्शन करण्यास येथें स्थलावकाश नाहीं, तथापि तीं सुंदर होतीं असें म्हटल्यावांचून आमच्यानें राहवत नाहीं. असो.

सन १८८६ सालीं दादाभाईंनीं विलायतेस जाऊन जें महत्कृत्य आरंभिलें तें अत्यंत प्रशंसनीय, हिंदुस्थानदेशाच्या कल्याणाचें केवळ आदिबीज असें होतें. परंतु तें अति संकटमय व दुष्प्राप्य असल्यामुळें त्यामध्यें यश मिळेल असा मुळींच संभव देखील नव्हता. तथापि, दादाभाईंनीं 'प्रयत्नाअंतीं परमेश्वर' ह्या म्हणीवर नजर देऊन तें सिद्धीस नेण्याचा पक्का निश्चय केला. हें महत्कृत्य ह्मणजे 'पार्लमेंट सभेमध्यें प्रवेश' हें होय हें आतां निराळें सांगावयास नकोच. इंग्लंडामध्यें राजाचा अधिकार नियमित (limited monarchy) असून सर्व प्रतिनिधिनिक्षिप्त राज्यव्यवस्था असल्यामुळें पार्लमेंट सभा हीच सर्व राज्यकारभाराची आदिभूमि झाली आहे. ह्या सभेंतील मंत्रिमंडळावर आमच्या देशाची राजकीय दु:खें परिहार करण्याचें काम सर्वस्वी अवलंबून असल्यामुळें त्याच्या कर्णीं हिंदुस्थानची दीनवाणी पोंहचविल्यावांचून दुसरा मार्गच राहिला नाहीं, असें पूर्णानुभवाअंतीं दादाभाईंस दिसून आलें. त्यांनीं विलायतेंत असतांना पूर्वीं-पासून फॉसेटप्रभृति (हिंदुस्थानचे सुप्रसिद्ध अंध कैवारी) अनेक महा-भागांशीं परिचय करून घेऊन तद्वारे हिंदुस्थान देशाची पार्लमेंट सभेमध्यें दाद लावण्याचा प्रयत्न केला होता. व त्या योगानें अत्यल्प फलप्राप्तिही होत असे; परंतु 'आप करेसो काम' ह्या ह्मणीप्रमाणें स्वत:च्यानें कोणतीही गोष्ट जशी सिद्धीस जाईल, तशी नुसत्या परावलंबनानें ती कधींही सिद्धीस जाणार नाहीं, ह्या यत्नवादी जनांच्या सिद्धांताप्रमाणें दादाभाईंनीं स्वत: पार्लमेंटसभेमध्यें प्रवेश करण्याचा निश्चय केला. आंग्लराजपद्धतीच्या अत्यंत शुद्ध तत्वामुळें कोण-त्याही ज्ञातीच्या गृहस्थांस पार्लमेंट सभेमध्यें अभिनिविष्ट होतां येतें, असें एका यहुदी (लॉर्ड बीकन्सफील्ड) गृहस्थांच्या उदाहरणावरून सिद्ध झालें होतें. तेव्हां, भगीरथ प्रयत्नानें आपणांसही तन्निवेश करतां येईल असा दृढ संकल्प करून, दादाभाई सन १८८६ सालच्या पार्लमेंटच्या सभासद-नियोजनामध्यें आपण स्वत: हॉलबोर्न बरोच्यातर्फे एक उमेदवार झाले,

आणि तत्रस्थ नियोक्तृमंडलास (Voters) आपल्याकडे वळविण्याचा प्रयत्न करूं लागले. त्यांनीं **हॉलबोर्न**वासी मतदारांची प्रार्थना करण्याकरितां एक सविनय हस्तपत्रक प्रसिद्ध केलें, आणि त्यांत त्यांच्या औदार्यादि गुणांचा यथातथ्य रीतीनें स्तव करून, असें ध्वनित केलें होतें कीं, तुह्मी जर मला आपल्या तर्फे निवडून द्याल तर माझ्यावर व माझ्या **हिंदुस्थान**वासी देशबांधवांवर अनंत उपकार होतील. **दादाभाईंनीं** ह्याशिवाय **हॉलबोर्न** टौन हॉल, स्टोअर स्ट्रीट हॉल, ओल्ड फ्रेन्डस् सेंट मार्टिन लेन, फिनिक्स हॉल, वगैरे ठिकाणीं **हॉलबोर्न**वासी मतदारांचीं मनें आपणाकडे वळविण्याकरितां आपल्या चित्ताकर्षक मधुर वक्तृत्वमोहिनीचा पुष्कळ उपयोग केला, व त्या योगानें वर्णभेद मनांत न आणतां गुणग्रहण करणारा **हॉलबोर्न**चा बराच नियोक्तृगण त्यांस अनुकूल झाला. **दादाभाई** सुयोग्य गृहस्थ असून त्यांस आपल्यातर्फे निवडून द्यावें अशाबद्दल ता. १८ जून रोजीं **थॉमस जान्सन** ह्यांच्या अध्यक्षतेखालीं भरलेल्या '**हॉलबोर्न** लिबरल असोसिएशन'च्या 'एक्झिक्युटिव्ह कमिटी'नें स्वतंत्र ठराव केला, आणि उइक्ली टाईम्स अँड एको, उइक्ली डिस्पाच, टाईम्स, यॉर्क हेरल्ड, रॉकडेल आब्झर्व्हर, फ्रीमन्स जर्नल, रेनाल्डस्, खिश्चन मिलियन, फनी फोक्स, एको, पालमाल ग्याझिट, हॉलबोर्न गार्डियन, पेनी इलस्ट्रेटेड पेपर, इत्यादि वृत्तपत्रांमधून त्यांच्याविषयीं चांगले उद्गार प्रसिद्ध झाले. **इंग्लंड**सारख्या सुधारलेल्या देशामध्यें 'वृत्तपत्रें ह्मणजे लोकमताचा सिंहनाद असल्याची सर्वत्र ख्याति आहे. आणि ज्याअर्थी त्यांतूनही **दादाभाईं**ची प्रशंसा झाली त्याअर्थी परदेशीय जनांवरही त्यांच्या अप्रतिम गुणांची केवढी छाप बसली होती ह्याचा विचार करणें आह्मी वाचकांवरच सोंपवितों.

असो. अशा प्रकारें **दादाभाईंनीं** चांगला प्रयत्न केला, परंतु आम्हां **भारत**-वर्षीयांच्या दुर्दैवानें, **दादाभाईं**स अवघीं १,९५० मतें मिळालीं, व त्यांचे प्रतिपक्षी **कर्नल एफ्. डंकन** ह्यांस ३,६५१ मतें मिळालीं. त्यामुळें **दादाभाईं**चा पार्लमेंटमध्यें प्रवेश झाला नाहीं! तथापि, धीर न सोडतां "प्रारभ्य चोत्तमजना नपरित्यजन्ति" ह्या सज्जन नियमाप्रमाणें त्यांनीं आपला प्रयत्न अंतःकरणपूर्वक तसाच चालू ठेवला एवढेंच येथें सांगणें अवश्य आहे.

**दादाभाई** सन १८८६ सालीं **हिंदुस्थानां**त परत आले. त्या वेळीं त्यांस **विलायतें**तील 'नॉर्थब्रुक क्लब'नें मेजवानी दिली. त्या वेळीं महोदर **लॉर्ड रिपनसाहेब** हे अध्यक्षस्थानीं होते. त्यांनीं **दादाभाईं**चा फार चांगला सत्कार करून त्यांच्या स्वदेशसेवेबद्दल, दृढनिश्चयाबद्दल, व सत्यश्रमाबद्दल आपले आनंदोद्गार व्यक्त केले.

**दादाभाई हिंदुस्थानास** आल्यावर जी एक अत्यंत सन्मानयुक्त महत्वाची कामगिरी त्यांच्याकडे आली, ती **कलकत्ता** येथें भरलेल्या दुसऱ्या राष्ट्रीयसभेचें

'अध्यक्षस्थानस्वीकरण' हें होय. **दादाभाईसारख्या** सुयोग्य गृहस्थाच्या गळ्यामध्यें राष्ट्रीयसभेनें आपल्या अध्यक्षत्वाची माळ मोठ्या आनंदानें घालावी हें साहजिकच आहे. तारीख २७ डिसेंबर सन १८८६ रोजीं **कलकत्ता** येथील टौन हॉलमध्यें राष्ट्रीयसभेचा द्वितीय समारंभ सुरू झाला. पंडितवर विद्वत् श्रेष्ठ **कै० डाक्टर राजा राजेंद्रलाल मित्र** हे त्या वेळीं स्वागतमंडळीचे अध्यक्ष होते. त्यांचे स्वागतपर भाषण झाल्यानंतर सर्वानुमतें **दादाभाईस** सभाध्यक्ष नेमण्यांत आलें. त्या वेळीं झालेल्या आनंददर्शक टाळ्यांच्या गुरुघोषानें सर्व मंडप दणाणून गेला होता. **ऑनरेबल दादाभाई नवरोजी** ह्यांनीं त्या समयीं जें भाषण केलें तें अत्यंत राजनिष्ट, सुमार्गदर्शक, मनोहर, सरल, आणि सत्यविचारपरिप्लुत असल्यामुळें, सर्व विद्वज्जनांनीं त्यांची फारफार वाहवा केली. ह्या भाषणामध्यें **दादाभाईनीं** जे गंभीर विचार दिग्दर्शित केले ते प्रत्येक राष्ट्रहितचिंतकानें आपल्या हृदयांत कोरून ठेवण्यासारखे आहेत* एवढेंच नव्हे पण त्यांतील महत्वाच्या सूचना, **हिंदुस्थानच्या** अभिष्टचिंतक **ब्रिटिश** राज्यकर्त्यांनीं नेहमीं विचार करण्यासारख्या आहेत, असें म्हटल्यावांचून आमच्यानें राहवत नाहीं.

द्वितीय राष्ट्रसभेचा समारंभ आटोपल्यानंतर सर्व देशबांधवाचे धन्यवाद घेतघेत **दादाभाई मुंबईस** आले. तेथें आल्यानंतर ता. १३ फेब्रुवारी सन १८८७ रोजीं त्यांच्या स्वागतार्थ एक मोठी सभा भरली होती. **सर दिनशा माणिकजी पेटिट** हे त्या सभेचे अध्यक्ष असून त्यांनीं **मुंबानगरवासी** जनांच्यातर्फे **दादाभाईंचें** फारफार गौरव केलें.

अशा प्रकारें स्वदेशियांकडून सप्रेम व कृतज्ञतापूर्वक सन्मान घेऊन **दादाभाई**

---

* दादाभाईंचे हें सर्व भाषण दुसऱ्या राष्ट्रीयसभेच्या इंग्रजी रिपोर्टमध्यें प्रसिद्ध झालें आहे, तें वाचण्याची जिज्ञासू वाचक तसदी घेतीलच. तथापि, पुढील दोन वाक्यें येथें सादर केल्यावांचून आमच्यानें राहवत नाहीं—

"Nothing is more dear to the heart of England—and I speak from actual knowledge—than India's welfare : and, if we only speak out loud enough, and persistently enough, to reach that busy heart, we *shall not speak in vain*."

* * * * *

"I for one am hopeful that, if we are only true to ourselves, *if we* only do justice to ourselves and the noble education which has been given to us by our rulers, and speak freely, with the freedom of speech which has been granted to us, we may fairly expect our Government *to listen to us and to grant us our reasonable demands*."

—INAUGURAL ADDRESS OF THE HON. DADABHAI NAOROJI, PRESIDENT OF THE SECOND INDIAN NATIONAL CONGRESS.

गोंवून घेतलें आहे, ह्याचें वर्णन निराळ्या शब्दांनीं सांगण्याचें प्रयोजनच नाहीं. त्यांच्या अभिनंदनपूर्वक सत्कारार्थ ज्या ठिकठिकाणीं प्रचंड लोकसभा भरत आहेत, आणि ठिकठिकाणीं जे आनंदोत्सव होत आहेत, हे त्याची उत्तम साक्ष होत. **मद्रासचे** सुप्रसिद्ध गृहस्थ **राय बहादूर पी. आनंदाचार्लू** ह्यांनीं **दादाभाईच्या** अभिनंदनार्थ केलेला आनंदोत्सव, **कलकत्त्याचे महाराज विनयकृष्ण बहादूर** ह्यांनीं केलेला दीपोत्साह, राष्ट्रीय सभाभक्त **राजा रामपालसिंह** ह्यांनीं केलेलें आनंदप्रदर्शन, **अलहाबादचे** प्रसिद्ध स्वदेशहितचिंतक **स्वामी अलाराम** ह्यांनीं अत्यंत कळकळीनें केलेला परमेश्वरस्तव, **इचलकरंजीचे** वकील **रा. रा. आपटे** यांनीं सर्व गांवभर वाटलेला शर्कराप्रसाद, **भावनगरचे ठाकूरसाहेब, बडोद्याचे दिवाणबहादूर, हैदराबादचे प्रधानबहादूर** इत्याद्यनेक संस्थानाधिपतींनीं व थोर गृहस्थांनीं **दादाभाईस** पाठविलेल्या अभिनंदनपर तारा; **कलकत्ता, मुंबई, मद्रास, अलहाबाद, पुणें, सातारा, सोलापूर, अहमदनगर, धारवाड, विजापूर, सुरत, शिकारपूर** इत्यादि प्रमुख स्थानीं भरलेल्या प्रचंड महाजन सभा व त्यांमध्यें **दादाभाई** व **सेंट्रल फिन्सबरीचे** उदार **आंग्लजन** ह्यांच्या आभारप्रदर्शनार्थ अंतःकरणपूर्वक निघालेले महाजनोद्गार इत्यादि अनंत गोष्टींवरून सर्व **हिंदुस्थान दादाभाईच्या** विजयानें आपणांस अत्यंत धन्य व भाग्यवान् समजत असून **सेंट्रल फिन्सबरीचें** चिर उपकारबद्ध झालें आहे हें उत्तम प्रकारें सिद्ध होतें. **दादाभाईच्या** अभिनंदनार्थ व **सेंट्रल फिन्सबरीच्या** आभारप्रदर्शनार्थ **विलायतेंत** 'न्याशनल लिबरल क्लब'मध्यें भरलेल्या सभेचे अध्यक्ष **राय तेज नारायणसिंह बहादूर (भागलपूर**—बंगाल—चे प्रसिद्ध राष्ट्रसभाभक्त ) ह्यांनींही असेंच म्हटलें आहे कीं, "**ब्रिटिश** राष्ट्रांतील लोक आह्मां **हिंदुस्थानवासी** लोकांस आपले प्रजाबंधु व देशबंधु समजून आमचा योग्य आदर करितात हें पाहून सर्व **हिंदुस्थान** अत्यंत आनंदित झालें आहे. ह्या आदराचें प्रत्यक्ष उदाहरण **सेंट्रल फिन्सबरीच्या** लोकांनीं, एका **हिंदुस्थान**वासी गृहस्थास पार्लमेंट सभेमध्यें आपल्यातर्फे नियुक्त केलें हेंच होय. खरोखर, **दादाभाईची** ही निवडणूक म्हणजे केवळ अद्वितीय चमत्कारच आहे. खरोखर, **इंग्लंडचा** इतिहास हा अद्भुत गोष्टींचें भांडारच आहे. असो. ह्याबद्दलचे सर्व सन्मान आणि सर्व आभार **सेंट्रल फिन्सबरीच्या** लोकांसच दिले पाहिजेत. कारण, हें केवळ त्यांच्या कृपेचें फल होय."

**दादाभाईच्या** विजयानें **हिंदुस्थानचेच** लोक आनंदसागरांत बुडून गेले आहेत एवढेंच नव्हे पण **ग्लाडस्टन, लॉर्ड रिपन, लॉर्ड रे** ह्यांच्यासारखे महात्मे व सर्व **उदार आंग्लजन** (Liberal Party) देखील सहर्ष झाले असून आमच्या

ह्या पार्शी कुलदीपक प्रपितामहतुल्य ( Grand Old Man ) महर्षीचे फारफार अभिनंदन करीत आहेत. व तिकडील सर्व सुज्ञ वृत्तपत्रकार **दादाभाईंचे** अत्यंत गौरव करीत आहेत. **इंग्लंडचें** केवळ मुख असें जें 'टाईम्स' पत्र त्यांत, **दादाभाई** निवडले गेले ही मोठी मौजेची व अदृष्टपूर्व गोष्ट घडून आली असें म्हटलें आहे. व जे अनुदार व परोत्कर्षाऽसहिष्णु जन, **दादाभाई** हे 'काळा मनुष्य' आहेत अशी कल्पना करून त्यांच्या गुणांची प्रशंसा करीत नव्हते ते आतां **दादाभाई** हे मंत्रिमंडलामध्यें विराजमान झाले असें पाहून गुप्त आनंद मानीत आहेत असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं! **इंग्लंडांतील**, पालमाल ग्याझिट, दि डेली क्रॉनिकल, दि स्टार, मॉर्निंग लीडर, ब्रॅडफर्ड आब्झर्व्हर, लीड्स मर्क्युरी, स्कॉटिश लीडर, न्याशनल आब्झर्व्हर, इत्यादि अनेक वृत्तपत्रें **दादाभाईंच्या** निवडणुकी[illegible]ल आनंदघोष करीत आहेत हें निराळें सांगावयास नकोच.

असो. असा विजयानंद चालला असतां मध्यंतरीं **दादाभाईंचे** प्रतिस्पर्धी गृहस्थ **क्याप्टन पेंटन** ह्यांनीं **दादाभाईंच्या** व आपल्या मतसंख्येचें पुनः संशोधन व्हावें म्हणून तक्रार केली, अशी अशुभ बातमी **हिंदुस्थानांत** येऊन धडकली, आणि सर्वांस आमच्या ह्या आनंदरूपी अमृतपूर्ण हृदयपात्रांत दुःखरूपी विषबिंदु पडून सर्वस्वी आमचा घात होतो कीं काय अशी फारफार भीति वाटूं लागली. परंतु **हिंदुस्थानच्या** पूर्व पुण्याईनें अथवा कृपासागर जगचालकाच्या पूर्ण दयेनें असा प्रकार झाला कीं, पूर्वी **दादाभाईंस** जीं तीन मतें अधिक होतीं तीं उलट पांच झालीं, व त्यांची निवड कायम झाली, एवढेंच नव्हे पण ते पार्लमेंट सभेमध्यें विराजित होऊन त्यांचें प्रथम भाषण ( Maiden Speech ) देखील झालें, हें ऐकून सर्वांसच अत्यंत आनंद होणार आहे.

**दादाभाई** पार्लमेंट सभेचे सभासद झाले ह्मणून सर्व **हिंदुस्थान**राष्ट्रांतील प्रजाजन, आपल्यावर सुवर्णाचा दिवस उगवला असें समजून आपणांस धन्य मानीत आहे तें अगदीं यथार्थ आहे. ह्याचें कारण, **दादाभाई** पार्लमेंट सभेमध्यें प्रविष्ट झाल्यानें **हिंदुस्थानास** अंशतः तरी कांहीं राजकीय हक्कांची प्राप्ति अथवा निदान राजकीय संकटांतून परिमुक्तता—ही प्राप्त होईल अशी प्रबल आशा उत्पन्न झाली आहे. **नामदार फेरोजशाहा मेथा** ह्यांनीं असे स्पष्ट ह्मणून दाखविलें आहे कीं, "**दादाभाई नवरोजी** हे, एक गोष्ट निसंःशय सिद्धीस नेणार ह्याची सर्वांस खातरी आहे. मग ती गोष्ट अल्पांशानें सिद्धीस जावो किंवा पूर्णपणें सिद्धीस जावो! ती गोष्ट ही कीं, **दादाभाई** हे निरपेक्ष बुद्धीनें व मोठ्या कळकळीनें, पार्लमेंट सभेमध्यें असा प्रयत्न करतील कीं त्या योगानें **हिंदुस्थान**वासी प्रजाजनांची राजनिष्ठा राज्ञीचरणीं सतत वृद्धि पावेल; ज्या **हिंदुस्थान**वासास ते प्राणाहून प्रिय मानितात त्यांतील राजकीय सुधारणासंवृद्धीचा त्या योगानें

हळूहळू दिव्य प्रकाश पडेल, आणि ह्या दोन्ही कृत्यांच्या योगानें त्यांच्यावर सर्वांकडून, सन्मान, प्रीति आणि धन्यवाद ह्यांचा चिरकाल अभिषेक होईल." हें अगदीं खरें आहे.

**भावनगर** संस्थानचे ज्युडिशियल कौन्सिलर -**मि० एम्. एम्. भावनगरी**, सी. आय. ई. —ह्यांनीं, ता. २३ जुलई रोजीं **विलायतेंतील हॉलबोर्न रेस्टारंट** ( Holborn Restaurant ) 'मध्यें **दादाभाई**प्रीत्यर्थ झालेल्या मेजवानीच्या प्रसंगीं जें सुंदर भाषण केलें, त्यांत त्यांनीं **दादाभाईं**चे गुणानुवाद गातांना, असें सांगितलें कीं, **दादाभाई** हे—

"Moving up from high to higher,
Become on Fortune's crowning slope,
The pillar of a people's hope,
The centre of a world's desire."

ह्या **इंग्रजी** कवितेंत वर्णन केल्याप्रमाणें, भाग्याच्या अत्युच्च शिखरास पोंहचलेला जनाशेचा स्तंभ व जगदिच्छेचा मध्याधार होय. तेव्हां, **दादाभाईं**संबंधानें आह्मी जास्त तें काय वर्णन करावें? अशा लोकोत्तर पुरुषाची योग्यता आणखी ती काय सांगावी? असल्या अप्रतिम रत्नाची महति आम्हीं कोठपर्यंत गावी? एका अर्वाचीन कवीनें तर **दादाभाईं**चा धन्यवाद गातांगातां, असें म्हटलें आहे कीं—

## श्लोक.

**तूं धन्य! धन्य तव माय! पिता तसाच! ।**
**तो धन्य आप्तजन! शिक्षक धन्य साच! ॥**
**त्वद्देश धन्य! तव बांधव तेहि धन्य! ।**
**याहून थोर जन फिन्सबरितील धन्य! ॥ १ ॥**
**सोन्याचिया उजळ उज्वल अक्षरांनीं ।**
**त्वन्नाम जीवित असो लिहिलें बुधांनीं ॥**
**खोदून ठेवुं हृदयीं तव लोक मूर्ति ।**
**पूजा करो हरिसमान तुझीच चित्तीं ॥ २ ॥**

असो. **दादाभाईं**च्या ह्या अत्यल्प चरित्रावरून पुष्कळ बोध घेण्यासारखा आहे, तो सुज्ञ वाचक ग्रहण करतील अशी आशा करून, आणि ह्या दीर्घप्रयत्नी व अद्वितीय देशहितकैवारी गृहस्थांस दीर्घायुरारोग्य प्राप्त होऊन त्यांच्या हांतून **हिंदुस्थान**चें अनंत कल्याण होवो, आणि **ब्रिटिश** राष्ट्राच्या सत्कीर्तीचे ध्वजा यावच्चंद्रदिवाकरौ फडकत राहो, अशी सत्यसंकल्पदात्या परमेश्वराचे अनन्यभावें प्रार्थना करून आह्मी हा चरित्रलेख येथें संपवितों.

# पद्यकुसुममाला.*

## श्लोक.

आर्यावर्तप्रपन्ना[1] ! विघिगजमथना[2] ! आंग्लभाषाप्रवीणा[3] ! ।
अस्मच्चित्तप्रसन्ना[4] ! सरसिजवदना[5] ! कल्पवृक्षप्रदाना[6] ! ॥
मुंबादेवीनिधाना[7] ! चिरसुखसदना[8] ! देशकामप्रपूर्णा[9] ! ।
**दादाभाई** ! जयश्री अनुकुल तुजला जाहली गौरवर्णा ! ॥ १ ॥
वर्णूं मी काय तूंतें ? अनुपम तव वा ! धैर्यमेरु[10] प्रचंड ! ।
वज्राचे[11] घाव त्याचेवरि जरि पडले सप्त वर्षे उदंड ! ॥
लोहाची वज्रकाया झगटुनि परिसा होय जेवीं सुवर्ण ।
तेवीं तें वज्र[12] झालें तुजसम तुझिया निश्चयानें सुवर्ण[13] ! ॥ २ ॥
झाले देशाभिमानी; भरतजननिच्या मंगलालागिं[14] ज्यांनीं— ।
आयुष्यें घालवूनी, अगणित कदनीं,[15] शौर्य तें गाजवूनी ! ॥
आर्येचे आर्यपुत्र प्रिय जरि अवघे धन्य ते जाहलेत ! ।
त्यांचें धन्यत्व तें वा ! तव पदिं रुळुनी लीन होई[16] प्रभूत ! ॥ ३ ॥
घेवोनी शस्त्र हातीं चरचर नरडीं शत्रुचीं कापुनीयां ! ।
वैधव्यातें तयांच्या पतिरत[17] दयितांलागिं रे देउनीयां ! ॥
स्वातंत्र्याचे सुभोक्ते अपरमित बळी जाहले शूरवीर ! ।
आतां तो काळ गेला नरपति पडतां आमचे थंडगार ! ॥ ४ ॥
प्राणांचें मानवांच्या दिनदिन कळतां राज्यकर्त्यांस मोल ! ।
झाला सिद्धांत त्यांचा सकलहि भुवनांहूनि काया अमोल ! ॥
आहे हें तत्व मोठें विविध बुधवरां मान्य साऱ्या जगांत ।
सौख्याचा सर्व ठेवा विरल सकलिकां सांपडे शांततेंत ! ॥ ५ ॥

---

* रा. रा. एकनाथ गणेश भांडारे ह्यांनीं हीं पद्यें नामदार दादाभाई ह्यांच्यावर रचिलीं आहेत. १ स्वबला हिंदुस्थानास वाहून घेणाऱ्या ! २ दैव हेंच कोणी हत्ती त्याचा नाश करणाऱ्या म. हे स्वपराक्रमावर वाढणाऱ्या ! ३ इंग्लिश भाषेंत प्रवीण (Professor) असणाऱ्या ! ४ आमचें चित्त प्रसन्न करणाऱ्या ! ५ कमलमुखा ! ६ इच्छित फल देणाऱ्या ! ७ मुंबादेवीच्या प्रिय रत्ना ! ८ तूं आमच्या सुखाचें कायमचें घर आहेस ! ९ देशाचे हेतू परिपूर्ण करणाऱ्या ! १० धैर्य हाच पर्वत ! ११ लॉर्ड सालिसबरी सारख्याचे. १२ लॉर्ड सालिसबरीसारखे कान्झरव्हेटिव्हज्. १३ चांगल्या वर्णाचे, ह्मणजे तूं आतां Black Man नव्हेस ! १४ कल्याणासाठीं. १५ लढाईंत. १६ आर्यमातेचे कित्येक आर्यपुत्र केवळ तरवारीच्या बळावर अनेक लढायांत स्वशौर्य गाजवून जरी "धन्य" झाले; तरी त्यांचें ते धन्यत्व तुझ्या सत्याच्या क्रमापुढें कांहींच नाहीं, असा भाव. विशेष उल्लेख पुढील दोन पद्यांत आहेच. १७ स्त्रियांस.

जेव्हां या शांततेची लगड पडलिसे आर्यमातेसभोंतीं ! ।
तेव्हां सर्वस्व गेलें तिळभर नुरलें आमच्या येथ हातीं ! ॥
शौर्याचा अस्त होतां परवश अवघा देश आर्या[1] ! जहाला ! ।
स्वातंत्र्याची अहाहा ! पुनरपि नव्हती लेश[2] आशा तयाला ! ॥ ६ ॥
पूर्वीचें सर्व कांहीं विसरुनि बसलों सर्व आम्ही खुशाल ! ।
अन्नाची भ्रांति तेणें हर ! हर ! पडली आज आह्मां त्रिकाल ! ॥
लाखो गेले मरूनी, प्रतिदिनिं मरती आणखीही क्षुधेनें ।
दारिद्र्यानें अह्मांला अकनक[3] करुनी नागवीलें शठानें ! ॥ ७ ॥
दासी झाली जियेची **भरत**जननिही आमुची दीनवाणी ।
काळानें वक्र डोळा तिजवर करितां दैवपूर्णाभिमानी ! ॥
स्वामीभक्ती जियेची निशिदिनिं करुनी हाय ! गेली थकोनी ! ।
**इंग्लंदे**ला कशी त्या करुणमय तिची जाइना ऐकुं वाणी ! ॥ ८ ॥
'हें सारें आत्मजांचें कुटिलपण तिच्या[4] पाहुनी कोहिंकांहीं' ।
धैर्यानें **आर्य**मातागतविभव पुन्हां आणण्याचे उपायीं ! ॥
गेलासी **लंदना** तूं, अभिनव अमुची स्वामिणी जेथ राहे ।
वक्तृत्वाच्या प्रवाहीं तव अति मधुरा, लोक तेथील पोहे ! ॥ ९ ॥
झाले तेथील सारे अनुकुल तुजला त्वद्गिरामाधुरीनें ।
ज्यांच्या चित्तीं स्थिरावें **भरत**जननिचें चित्र तें दीनवाणें ॥
तों ये राष्ट्रीयसंसद्[5] अवचित उदया बालसूर्यासमान ।
**दादाभाई** ! श्रमाची अनुपम तुझिया भागवाया तहान ! ॥ १० ॥
अस्मद्दैवप्रभावें चिर अवनतिचीं तेविं त्या उन्नतीचीं ।
सूत्रें सारीं धरूनी दृढतम, बनली सूत्रधारी जगाची ! ॥
ऐशा त्या लोकसत्तात्मक नव रुचिरीं संसदीं "पार्लमेंटीं" ।
यत्नें गेलास तेणें तुजवरिं करितें विश्व हें पुष्पवृष्टी ! ॥ ११ ॥
होशी तूं धन्यधन्य प्रियतम अनुजा आमुच्या साधुवर्या ! ।
**पार्शी**सत्कूलदीपा ! निजतनु सदया ! अर्पिली देशकार्या ! ॥
धन्या माता त्वदीया ! तव जनक तसा धन्य तो श्रेष्ठ होय ! ।
धन्य प्रज्ञा[6] तुझी बा ! तव कुल अवघें वंद्य होऊन जाय ! ॥ १२ ॥
आर्यावर्तोन्नतीचा जर कुणि असला घातला दिव्य पाया ! ।
**दादाभाई** ! तुझें बा ! स्मरण सकालिकां सत्य होईल राया ! ॥
घाली तूंते जयश्री मुकुट दिनिं जया आपुल्या मस्तकाचा ! ।
अठ्ठाशे व्याण्णवाचा दिवस जुलइचा होय तो साहवीचा[7] ! ॥ १३ ॥

---

१ दादाभाई ! २ थोडी सुद्धां. ३ द्रव्यहीन ४ इंग्लंदेच्या. ५ राष्ट्रीयसभा. ६ बुद्धि. ७ ता० ६ जुलई सन १८९२.

अहा! **दादाभाई**! 'भरतधरणीमोदजनका!'।
अहा! स्वातंत्र्याच्या सुखसदननिःशंकभजका! ॥
अहा! धीरोदात्ता! उपकृतिकरा! कीर्तिविजया!।
अहा! **नौरोजीच्या** सरल हृदया! दिव्य तनया! ॥ १४ ॥

अहा! वाग्देवीच्या हृदयकमलासक्तमधुपा!।
अहा! आर्यावर्तानुज-बहुविध-प्रेमल-नृपा! ॥
कृपा केली राया! तुजवर तया **फिन्सबरिनें**।
स्वदेशोत्कर्षाचीं तुज सुलभ होतांच अयनें[1]! ॥ १५ ॥

तृषार्ता पक्ष्याने जलधर[2] पयार्थां[3] विनविलें।
तयांनींही त्याचे अति विमल हेतू पुरविले! ॥
तसें **दादाभाई**! तव मृदुवचें **फिन्सबरिनें**।
तुला केलें धन्य त्रिभुवनिं महोदार कृतिनें! ॥ १६ ॥

तुझा त्यांचा[4] कांहीं तिळभर न संबंध पाहिला।
तुझ्या दोघांच्याही मधिं जलनिधी थोर पडला! ॥
असूनीयां ऐसें प्रतिनिधिपणा त्यांहिं अपुला।
'गुणाःपूजास्थानं' गणुनि दिधला योग्य तुजला! ॥ १७ ॥

जयश्री ती माळा तव मृदु गळां घालुनि जगीं!।
असे धन्या झाली चढूनि धवला वैभवनगीं[5]! ॥
असें पाहूनीयां भरतजननी हार्षित मनीं–।
अशी झालीसे कीं तिजशिं उपमा न त्रिभुवनीं! ॥ १८ ॥

आलें **भारत**भाग्य आज उदया ऐसें मला वाटतें!।
आशा सुंदर मार्गदर्शक अतां झाली असें भासते! ॥
आतां जाइल दिव्य आर्यजननी सौख्यालयाभीतरीं!।
नांदाया; अनुकूल दैव तिजला होतांच कालांतरीं! ॥ १९ ॥

आनंदें दिन आजपासुनि तिचे जातील निःसंशय!।
साम्राज्यीं नरनारि सर्वहि तिच्या होतील रे! निर्भय! ॥
देवालाहि तिचा महा कळवळा आला असे शेवटीं!।
झालासे तिजला प्रसन्न सखया! प्रत्यक्ष तो धूर्जटी[6]! ॥ २० ॥

ज्याचा अंत कधींहि हे बुधवरा! देवादिकां ना कळे!।
तें आकाश विशाल केवळ खुले चंद्रप्रकाशामुळें! ॥

---

१ मार्ग. २ मेघ. ३ पाण्यासाठीं. ४ सेंट्रल फिन्सबरी येथील लोकांचा. ५ वैभवपर्वतावर. ६ महादेव.

तेव्हां **भारतवर्ष** हा किति जरी विस्तीर्ण झाला तरी।
**दादाभाइ!** सुरत्न तूं चमकशी! बा! त्याचियाभीतरीं! ॥ २१ ॥
आले आजवरी प्रसंग तिजला[१] जे जे महा दुर्धर।
आतां होइल तन्निवारण तिच्या[१] भाग्योदयें लौकर ॥
होती दुर्लभ 'पार्लमेंट' अवघ्या काळ्या[२] मनुष्यांप्रती!।
काळा[३] तूं असुनी तिला सुलभशी केलीस बा! सांप्रतीं! ॥ २२ ॥
सभा भरुनियां प्रभा म्हणुनि आपुल्या फांकिती!।
अनेकपरिनें तुला स्तवुनि धन्य! त्या बोलती! ॥
अनंत कवि जाहले नृपहि जाहले भूवरीं!।
प्रसन्न तुजवांचुनी विधिकृती न झाली परी! ॥ २३ ॥
उदारचरितीं जयीं प्रतिनिधी तुला नेमिलें!।
कृतज्ञ निज[४] माउली सतत राहि त्यांची; कळे! ॥
वळेल रवि मागुता, प्रखर चंद्र तो होइल!।
परी न उपकार **फिन्सबरिचे** कर्मा होतिल! ॥ २४ ॥
तुम्हां उभयतांप्रती म्हणुनि मानपत्रावली।
अनेक दिधल्या जणों बुधवरीं सुमुक्तावली! ॥
करा उभयतां अतां विमल आदिकर्तव्य तें।
जयें अखिल विश्व हें चिरसुखाप्रती पावतें! ॥ २५ ॥
कला रुचिर वाढते हळुंहळूं शशीची जशी।
शतायुविभवादिकांस तव वाढ लागो तशी! ॥
करो तुजवरी दया अखिल सृष्टिचा चालक।
तुझ्या सुकृतिनीं तयें विजयांनीस हो[५] कौतुक ॥ २६ ॥
अनंत सण जाहले, सुखद भव्य दीपावली[६]!।
परंतु बसलासि जे सुदिनिं राजमंत्र्यावलीं[७]! ॥
करूं दिवस साजरा सकलही सण श्रेष्ठ तो!।
सु-योग असला कुणां न कधिंही सदां लाभतो! ॥ २७ ॥
नभस्थ असतां रवी उमलताति पद्मावली!।
तसा असुनि दूर[८] तूं निकट भासशी ह्या स्थलीं!॥
सुवर्ण[९] नवमालिका प्रिय असे तुझ्या कीर्तिला!।
म्हणूनि तुज अर्पितों; सतत घालण्या दे दिला! ॥ २८ ॥

१ आर्यमातेला. २ पार्लमेंटचे मेंबर होण्यास पात्र अशा नेटिव्हांस. ३ Black
४ आर्यमाता. ५ होवो. ६ दिवाळी. ७ पार्लमेंटच्या सभासदांच्या रांगेत. ८ इं
ग्लंड येथें. ९ नागच्या पर्यांचा नूतन हार किंवा सोन्याची नवी माळ.

वरील स्थितीची जाणीव असूनही- तिच्या नाशाचा हेतू धरून खटपट करणाऱ्या राष्ट्रहितकर्त्या नेत्या पुरुषांची दृष्टी, वरील स्थिति प्राप्त होण्याच्या मूळ कारणांकडे व त्याच्या नाशाचा जो मुख्य उपाय—की ज्याच्या प्रभावाने हा भारत देश कितीतरी उच्च अशा वैभवशिखरावर चढला असून, त्याच्या जोरावरच याचें ऐश्वर्य युक्तत्व अक्षय्य आहे. ही गोष्ट पुरातन इतिहासावरून प्रसिद्ध तर आहेच, तात्पर्य सनातनधर्मानुबद्धत्व हा जो भारतीयांचा विशेष आहे त्याच्याकडे व वैशिष्ट्याकडे मुळींच वळत नाहीं! उलट, ते स्वतः अखिल जनतेसह बुद्धि व्यामोहाला बळी पडून अनिष्ट परिणामी मार्गाकडेच सारखे ओढले जातात!

सनातन धर्म हा इतर कोणत्याही धर्मा (?) प्रमाणें एकांगी, संकुचित व विशिष्ट समजुतीच्या पायावर उभारलेला नसून, तो सर्व जीवमात्रांचें नियमन करणारा आहे. अभ्युदय व निःश्रेयस यांची पूर्ण सिद्धि हा त्याचा मुख्य हेतु आहे. म्हणजे अभ्युदय—ऐहिक उन्नति व पारमार्थिक कल्याण यांना साधक असलेल्या साधनांची तो समष्टि आहे. वरील मुख्य हेतूला साधक असलेल्या साधनांचाच अवलंब करून, घातक गोष्टींचा त्यागच केला पाहिजे, अशा विधिनिषेधांचा बोध करणें हें त्याचें विशिष्ट नियामकत्व आहे. व या विधिनिषेधात्मक शासनानुरूप पीठ धर्माचें मुख्य स्वरूप मथळ्यावरील श्लोकांत स्पष्टपणें कथन केलें आहे. पीठ धर्माचें हें मुख्य स्वरूप लक्ष्यांत घेतलें असतां, त्याला अनुसरून लिहिलेल्या 'अंकुश' तील लेखांचें महत्व सहज कळणारें आहे. तसेंच एका विशिष्ट मार्गाचा बोधक व विशिष्ट मार्गीयांच्याच उपयोगी हा 'अंकुश' असल्याचा भ्रामक समज सहज निरस्त होणारा असून प्रत्येक कल्याणेच्छूलाच तो उपयोगी आहे. ही गोष्टही पण कळून येईल. याकरितां प्रत्येक धर्माभिमान्यानें याचा अवश्य संग्रह करावा. निदान प्रसिद्ध झालेले दोन वर्षांतील सर्व अंक ( किंमत साडे सहा रुपये ) तावडतोब मागवून संग्रहीं ठेवावे. तिसरें वर्ष लौकरच सुरू होणार आहे. वा. व. आगाऊ तीन रुपये सहा आणे, वर्षारंभ माघापासून.

गा. हेरंबराज बाळशास्त्री सं. अंकुश, श्रीक्षेत्र मोरेश्वर
पो. मोरगांव, जि. पुणें.

हें पुस्तक—त्रिं. ह. आवटे यांनी 'इंदिरा' प्रेस पुणें येथें छापिलें.

## श्रीयोगीन्द्र मठाचा संदेश.

श्रीयोगीन्द्रमठाकडून प्रसिद्ध झालेल्या अनेक पत्रिकांमधून श्रीयो मठधर्मांचा जो उल्लेख करण्यांत आलेला आहे. त्यांपैकीं ' ग्रंथसंपादन व ज्ञान कार्य ' किती महत्वाचें व उपयुक्त आहे हें त्याकरितांच प्रवृत्त झाले ' अंकुशा' तील आजपर्यंतच्या लेखांवरून कळून आलेंच आहे. त्यांतील ग्रं आज ज्या रीतीनें प्रकट केले जात आहेत, तसे ते किती अपूर्व आहेत लिहितां येणें शक्य नाहीं. तें प्रत्यक्ष कळणें शक्य आहे. याकरितां श्री गीन्द्रमठधर्मप्रसाराला सहाय्य व्हावें म्हणून सर्वांनीं ' अंकुशा ' चा करून व इतर प्रकारांनीं मदत करून आपलें कर्तव्य पूर्ण करावें. 'अं ची आगाऊ वर्गणी तीन रुपये सहा आणे. वर्षारंभ माघापासून.

सर्वाधिकारी—श्रीयोगीन्द्र मठ,
संस्थान—श्रीक्षेत्र मोरेश्वर, जि.

## गाणपत ग्रंथावली.

| ग्रंथांक. | नांव. | किंमत रु. | आ. | पै |
|---|---|---|---|---|
| १ | श्रीगणेशसहस्रनाम व अष्टोत्तरशतनाम. | ० | २ | ० |
| २ | श्रीगणेशाथर्वशीर्ष—भाष्यपाठशुद्ध. | ० | १ | ० |
| ३ | श्रीगाणेश—व्रतावली. | ० | १ | ० |
| ४ | श्रीगणेश भजन. | ० | ४ | ० |
| ५ | श्रीगणेश करुणाष्टकें. | ० | ४ | ० |
| ६ | श्रीस्वानंदेशस्तोत्र—प्राकृत. | ० | ३ | ० |
| ७ | श्रीगणेशगीता-भाष्यपाठशुद्ध व पठनविधिसह | ० | ८ | ० |
| ८ | श्रीगाणेश मठादर्श. | १ | ० | ० |
| ९ | श्रीअंकुशधारी चरित्र. | ० | ३ | ० |
| १० | श्रीमोरेश्वर क्षेत्रवर्णन. | ० | १२ | ० |
| ११ | गाणपत—नित्यपाठ—स्तुतिरत्नमाला. | ० | ६ | ० |
| १२ | श्रीविघ्नेशाष्टक—स्तुति—सटीक—सविवरण. | १ | ० | ० |

सर्वांना टपाल खर्च निराळा.

पत्ता:—श्रीयोगीन्द्रमठ—श्रीक्षेत्र मोरेश्वर, पोष्ट मोरगांव, जिल्हा पुणें.
१ मुंबई-वि. प. जोशी कांदेवाडी नंबर ४, २ पुणें-केसकर नं. ५० बु